पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६६

सभावृत्तांत

दिनांक – २०/०१/२०२२ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **जानेवारी - २०२२** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरूवार** दिनांक **२०/०१/२०२२** रोजी दुपारी २.०० वाजता मा. अवरसचिव महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जानेवारी २०२२ अन्वये आयोजित करणेत आली होती. मा.महापौर यांनी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरून ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून ऑनलाईन पध्दतीने अथवा मोबाईल ऍपद्वारे उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.अश्विनी संतोष जाधव
६) मा.सारीका शिवाजी सस्ते
७) मा.राहुल गुलाब जाधव
८) मा.वसंत प्रभाकर बोराटे
९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३) मा.गायकवाड निर्मला मनोज
१४) मा.सागर बाळासाहेब गवळी
१५) मा.गोफणे अनुराधा देविदास
१६) मा.बारसे प्रियांका प्रविण
१७) मा.अजित दामोदर गव्हाणे

१८) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१९) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२२) मा.फुगे भिमाबाई पोपट

२३) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२४) मा.सावळे सिमा रविंद्र

२५) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२६) मा.गीता सुशिल मंचरकर

२७) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२८) मा.अनुराधा गणपत गोरखे

२९) मा.केशव हनुमंत घोळवे

३०) मा.मंगला अशोक कदम

३१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३२) मा.संजय बबन नेवाळे

३३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३७) मा.पवळे सुमनताई मधुकर

३८) मा.चिखले सचिन तुकाराम

३९) मा.राजू मिसाळ

४०) मा.शैलजा अविनाश मोरे

४१) मा.अमित राजेंद्र गावडे

४२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४३) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४४) मा.ढाके नामदेव जनार्दन

४५) मा.माधुरी  कुलकर्णी ऊर्फ मोनाताई

४६) मा.करुणा शेखर चिंचवडे

४७) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

४८) मा.भोईर सुरेश शिवाजी

४९) मा.अपर्णा निलेश डोके

५०) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५१) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५२) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५३) मा.जयश्री वसंत गावडे

५४) मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे

५५) मा.सुलक्षणा राजू धर

५६) मा.शाम गणपतराव लांडे

५७) मा.सुजाता सुनिल पालांडे

५८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५९) मा.अभिषेक गोविंद बारणे

६०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६२) मा.बारणे माया संतोष

६३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६४) मा.दर्शले रेखा राजेश

६५) मा.कलाटे राहुल तानाजी

६६) मा.ममता विनायक गायकवाड

६७) मा.कामठे तुषार गजानन

६८) मा.चोंधे आरती सुरेश

६९) मा.कस्पटे संदिप अरुण

७०) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७२) मा.सुनिता हेमंत तापकीर

७३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७४) मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७५) मा.कुटे निर्मला संजय

७६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७८) मा.आंगोळकर सागर सुनिल

७९) मा.मुंढे उषा अंकुश

८०) मा.लोखंडे चंदा राजू

८१) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

८५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८७) मा.नवनाथ दत्तू जगताप

८८) मा.सोनवणे शारदा हिरेन

८९) मा. संजय मल्हारराव वाबळे

९०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.जितेंद्र वाघ-अतिरिक्त आयुक्त (२),मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील-शहरअभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.लोणकर, मा.इंगळे, मा.खोत, मा.चारठाणकर, मा.इंदलकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.चव्हाण, मा.निकम, मा.सवणे, मा.भालकर,मा.इंगळे, मा.तांबे, .ण् - सह शहर अभियंता, मा.बोधडे, मा.देशमुख, मा.नेमाने, -सहाय्यक आयुक्त, मा.पाटील, मा.सूर्यवंशी, मा.पोरेड्डी, मा.जुंधारे, मा.शिंदे, मा.वाघुंडे, मा.टकले, मा.भोसले, मा.घुबे, मा.महाजन, मा.खाबडे, मा.देशमुख, मा.धुमाळ, मा.चव्हाण, मा.न-होना -कार्यकारी अभियंता, मा.गावडे- मुख्य अग्निशामक अधिकारी, मा.पाटील-प्राचार्य (आयटीआय), मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता (वायसीएम), मा.डॉ.गोफणे-वैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर –** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) स्थापत्य PMAY प्रकल्प विभागाकडील पंतप्रधान अवास योजना प्रकल्पांसाठीचे सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातील प्रकल्पनिहाय वाढ / घट करणेस मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करून घेणेबाबतची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली आसता –

अनुकुल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, जेष्ठ समाजसेविका, अनाथांची माय- पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांचे निधन, पिंपरी चिंचवड महापालिका भाजपा नगरसेवक शितल शिंदे यांचे वडील - गोरख शिंदे यांचे निधन, भारतीय जनता पक्षाचे विधानपरिषद सदस्य - आर. एन. सिंह यांचे निधन, माजी मंत्री, ज्येष्ठ नेते व पुरोगामी विचारवंत - प्रा. एन. डी. पाटील यांचे निधन, जम्मूमधील वैष्णोदेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये १२ भाविकांचे निधन, मराठी चित्रपट व नाट्य क्षेत्रातील जेष्ठ अभिनेत्री - रेखा कामत यांचे निधन, जेष्ठ व्हायोलिन वादक - भालचंद्र देव यांचे निधन, पिंपरी चिंचवड महापालिकेतील कर्मचारी - सुनिल शिंदे व उपलेखापाल अशोक पवार यांचे निधन, मेहता पब्लिकेशनचे संचालक - सुनिल मेहता यांचे निधन, प्रसिध्द लेखक/ प्रकाशक - अरुण जाखडे यांचे निधन, जेष्ठ कथ्थक नर्तक पद्मविभूषण - पंडीत बिरजू महाराज यांचे निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा. उत्तम केंदळे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.महापालिका सभा क्रमांक -६२ दि. २०/०९/२०२१ (दु.२.०० व २.३५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आपले पिंपरी चिंचवड शहरा मधले आणि माझ्या वॉर्डातील आणि एकूण शहरामधले तीन सायकलस्वार यांनी जम्मू ते कन्याकुमारी पर्यंत प्रवास केलेला आहे आणि आपल शहर देशामध्ये सायकलीमध्ये आकराव्या क्रमांकावर आलेल आहे आणि म्हणून अशा विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात यावा अशी मी विनंती करतो.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब सदर विषयास मी अनुमोदन देतो.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सत्तारूढ पक्षनेते, मा. विरोधी पक्षनेते, मा.गटनेते, मा.सर्व पदाधिकारी व संबंधित सन्मा.सदस्य यांचे हस्ते सचिन नेमाडे, संदीप उढाणे, नवनाथ रोडगे, यश विजय चिनावळे, तन्मय नरेंद्र खांबे, चैतन्य दिलीप आफळे, समृद्धी रामभाऊ शिंदे, आस्मी मनोज राऊत, अद्वैत भूषण शिंदे, गौतमी संजय निकम, धनंजय पाटील यांचा विशेष कार्याबद्दल सन्मान करण्यात आला).

---

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७६२ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. कर/मुख्य/९/कावि/३६३/२०२१, दि.०३/१२/२०२१.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०८३६ दि.८/१२/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ च्या तरतूदी अन्वये महानगरपालिकेने, कार्यक्षेत्रातील मिळकतींवर कर व करेत्तर बाबींचे दर सन २०२१-२०२२ करिता लागू केलेले आहे तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली राज्य शासनाने ठरवून दिलेल्या दराने महाराष्ट्र शासनाचे करिता केली जाते. सन २०२२-२०२३ या सरकारी वर्षाकरिता दिनांक २० फेब्रुवारी २०२२ पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ अन्वये सन २०२२-२०२३ या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी / शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्ताव: सन२०२२-२०२३ या सरकारी वर्षा करिता कराचे व करेत्तरबाबींचे दर निश्चितीबाबत.

**करांचे दर**

| अ. क्र. | कराचे नाव | कर आकारणी पध्दत कर योग्य मूल्यावर | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/- ते 12000/- | 13% | 14% | 13% | 14% |
| | | रक्कम रुपये 12001/- ते 30000/- | 16% | 17% | 16% | 17% |
| | | रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | 24% | 24% | 24% | 24% |
| 1ब | साफसफाई कर | कर योग्य मूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | कर योग्य मूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | कर योग्य मूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |

| अ. क्र. | कराचे नाव | कर आकारणी पध्दत कर योग्य मूल्यावर | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | कर योग्य मूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | कर योग्य मूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 4 | रस्ता कर | कर योग्य मूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेष साफसफाई कर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय,सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | कर योग्य मूल्यावर | -- | 2% | -- | 2% |
| 6 | वृक्षकर | कर योग्य मूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |

वरील करांव्यतिरिक्त “नाटयगृह कर ”(करमणूक कर) खालीलप्रमाणे वसूल केला जातो.

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 7 | नाटयगृहा वरील कर (करमणूक कर) | 1. सिनेमा | | |
| | | अ(500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था) सिट्स (असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | प्रती दिवस रु.250/- |
| | | ब (मराठी सिनेमा | करमाफी | करमाफी |
| | | क (वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | प्रती दिवस रु.350/- |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 3. सर्कस (कॉन्व्हिल पेट्स) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 4. तमाशा | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 5.संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थियटर मधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 6. कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास रु.50/- | प्रती प्रयोगास रु.50/- |
| | | 7. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास) जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास | प्रती दिवस रु.100/- | प्रती दिवस रु.100/- |

<u>ब.सामान्यकरातील सवलत योजना: सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)</u>

| अ.क्र | योजना | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत :रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कमसूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कमसूट |
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या, स्वत : रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कमसूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कमसूट |
| 3 | 40%किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कमसूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कमसूट |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस- 10%रक्कम सूट<br>2. बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ .मिळकतीस- 5%रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस- 10%रक्कम सूट<br>2. बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक/ मोकळया जमिनी इ .मिळकतीस- 5%रक्कम सूट |
| 5 | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती ग्रीहा: ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी .पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीनबिल्डींगCertificateप्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कररक्कमेच्या<br>· 3Star Rating -05% रक्कमसूट<br>· 4Star Rating - 08% रक्कमसूट<br>· 5Star Rating - 10% रक्कमसूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>· 3Star Rating -05% रक्कमसूट<br>· 4Star Rating - 08% रक्कमसूट<br>· 5Star Rating -10% |

| अ.क्र | योजना | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | | रक्कमसूट |
| | स्वग्रीहा:ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी .पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागा मार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीनबिल्डींगCertificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कर रक्कमेच्या<br>· 1Star Rating -05%रक्कमसूट<br>· 2 Star Rating - 08%रक्कमसूट<br>· 3Star Rating- 10%रक्कमसूट<br>· 4Star Rating- 12%रक्कमसूट<br>· 5Star Rating- 15%रक्कमसूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देयसामान्य कर रक्कमेच्या<br>· 1Star Rating - 05%रक्कमसूट<br>· 2 Star Rating - 08%रक्कमसूट<br>· 3Star Rating- 10%रक्कमसूट<br>· 4Star Rating- 12%रक्कमसूट<br>· 5Star Rating- 15%रक्कमसूट |
| 6 | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे राहणाऱ्या त्याच प्रमाणे शहरात वास्तव्य करणाऱ्या माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात)सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर( 100% सूट | मालमत्ता करात)सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर( 100% सूट |
| 7 | प्रामाणिकपणे दरवर्षी मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकत धारकांना सामान्य करात 2% (दोन) जादा प्रोत्साहनपर सवलत योजना लागू करणेबाबत) 3 वर्षाचे ब्लॉक नंतर चौथ्या वर्षी (संदर्भ : परिपत्रक दि . 21/05/2021 | मागील सलग 3 आर्थिक वर्षामध्ये 31 मार्चपूर्वी थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एक रक्कम भरणा करणा-या मिळकत धारकांना चौथ्या वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्य कर रक्कमे च्या 2% रक्कम सूट (अ.क्र .1 ते 5 मधील पात्र सवलतीसह( | मागील सलग 3 आर्थिक वर्षामध्ये 31 मार्चपूर्वी थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एक रक्कम भरणा करणा-या मिळकत धारकांना चौथ्या वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्य कर रक्कमेच्या 2% रक्कम सूट (अ.क्र .1 ते5 मधील पात्र सवलतीसह) |
| 8 | माझी मिळकत माझी आकारणी योजना : स्वयंस्फुर्तीने मिळकत कराची आकारणी करणा-यांसाठी सवलत<br>संदर्भ :परिपत्रक दि .08/10/2021 | महापालिकेच्या संकेतस्थळावर मिळकत कराच्या नोंदणीसाठी अर्ज करणा-यांना मिळकतीची ज्या आर्थिक वर्षात कर आकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामध्ये सामान्य करामध्ये 5% फक्त पहिल्या वर्षाकरिता सूट (अ.क्र .1 ते 5 | महापालिकेच्या संकेतस्थळावर मिळकत कराच्या नोंदणीसाठी अर्ज करणा-यांना मिळकतीची ज्या आर्थिक वर्षात कर आकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामध्ये सामान्य करामध्ये |

| अ.क्र | योजना | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | मधील पात्र सवलतीसह) | 5% फक्त पहिल्या वर्षाकरिता सूट (अ.क्र .1 ते 5 मधील पात्र सवलतीसह) |
| 9 | वरील योजने पैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकत धारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्य करातील सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत) बिल मिळो अथवा न मिळो) | अ.क्र .1 ते5 मधील सवलत योजनांसाठी- दिनांक 30 जूनअखेर<br>अ.क्र .6 चे सवलत योजनेसाठी संपूर्णवर्ष<br>अ.क्र .7 व 8 चे सवलत योजनेसाठी संपूर्णवर्ष (अ.क्र .1 ते 5 सवलत योजेनचा लाभ फक्त 30 जून पर्यंत) | अ.क्र .1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी- दिनांक 30 जून अखेर अ.क्र .6 चे सवलत योजनेसाठी संपूर्णवर्ष<br>अ.क्र.7 व 8 चे सवलत योजनेसाठी संपूर्णवर्ष (अ.क्र .1 ते 5 सवलत योजेनचा लाभ फक्त 30 जून पर्यंत) |
| 10 | थकबाकी सह एक रक्कमी मिळकत कराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणा-या मिळकत धारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्य करात सवलत | 1. दि.1/4/2021 ते 30/6/2021 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2. दि.1/7/2021 ते 31/3/2022 अखेर सर्वसाधारण करात 2% | 1.दि.1/4/2022 ते 30/6/2022 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2.दि.1/7/2022 ते 31/3/2023 अखेर सर्वसाधारण करात 2% |

क. करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर

| अ . क्र. | नाव | सन 2021-2022चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2022-2023करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्य मूल्यावर 5% | करयोग्य मूल्यावर 5% |
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवा शुल्क | प्रति बीलास10/- रूपये | प्रति बीलास10/- रूपये |

सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी/ शुल्क निश्चित करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीत मनपा हद्दीमधील ज्या निवासी मिळकतकर धारकांचे कोरोना या महामारीने मृत्यु झालेला आहे. व

त्यांच्या नावावर मिळकत आहे. आशा कुटुंबाला दिलासा देणे कामी सन २०२२-२३ या सरकारी वर्षाकरीता कराचे व करदोत्तर बाबीचे दर निश्चित करताना आशा मिळकतींना चालु सरकारी वर्षाचे चालु मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या १००% सुट तसेच मिळकत कर हस्तांतरण नोंद नोटीस फी मिळकतकर धारकांच्या कुंटुंबियाना माफ करण्यास तसेच कोरोना मुळे मृत्यु झालेल्या मिळकतकर धारकांच्या मिळकती हस्तांतरण करण्याची मोहीम ३१ जानेवारी २०२२ पर्यत राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब विषय क्रमांक २ व मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.मनपा आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०४/कावि/४३/२०२१ दि.०३/१२/२०२१

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०८५३ दि.१५/१२/२०२१

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद यांचेकडील पत्र क्र. जावक क्र.२२१७-२०/२०२१ दि.०२/०९/२०२१ अन्वये सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामा साठी र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस विनंती केली आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता पाळीव प्राण्यांना आवश्यक सोय सुविधांचे आधुनिकीकरण व स्पेशलाईज सेवा उपल्बध करुन सेवा नियमीत व प्रभावी होण्यासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीसाठी एक सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल, औंध येथे नियोजीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पाळीव प्राणी (लहान व मोठे) यांची संख्या जास्त असुन दिवसेंदिवस पाळीव प्राणी पाळणेची अभिरुची वाढत आहे. त्यामुळे संख्ये मध्ये भर पडत आहे. तसेच शहराची पार्श्वभूमी पाहता ग्रामीण भागाचे एकत्रीकरण होऊन शहराची निर्मिती झाल्याने मोठी जनावरे पाळण्याचे प्रमाण देखील लक्षणीय आहे. या सर्व पशुधनावर वेळेवर उच्च दर्जाच्या तज्ञांकडुन रोग निदान व उपचार/ शैल्यचिक्तिसा होणे आवश्यक आहे. सदरचे सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल, औंध या सर्व सुविधा उपल्ब्ध करुन देण्यास व संदर्भीय रुग्णालय पशुंसाठी जीवनदायी ठरणार आहे. सदरचे हॉस्पिटल मार्फत खालील सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे.

1. पिंपरी चिंचवड हद्दीसाठी २४*७ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देणे.
2. आय.पी.डी सुविधा (अंतर रुग्णविभाग)

3. सर्व प्रकारचे शल्यचिकित्सा.

4. तज्ञ मार्गदर्शक मार्फत पशु पालकास मार्गदर्शन व सल्ला.

5. सर्व प्रकारच्या रोग निदान व उपचार सेवा माफक दरा मध्ये उपल्बध करुन देणे.

येणे प्रमाणे नियोजीत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा फायदा पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना त्यांचे पशुधनास तत्पर तज्ञतेची पशु रोग निदान आणि उपचार मार्गदर्शन सल्ला देणे या बाबतचे सेवा शासकीय पशुवैद्यकांद्वारे मापक शासकीय दराने उपल्बध होणार असल्याने, या लोकहितार्थ कारणासाठी उक्त हॉस्पिटलच्या इमारतीच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी मागणी केलेली आहे. सदर प्रकल्पाची उपयुक्तता व लोकहित याचा सकारात्मक विचार करुन सदर प्रकल्पास मागणी केले प्रमाणे नियोजित प्रकल्पाच्या मंजुरीस अधिन राहुन नव्याने शिर्षक तयार करुन त्या लेखाशिर्षकावरील तरतुदीमधून खर्ची टाकणे देणे योग्य राहील. सद्यस्थितीत पशुवैद्यकीय विभागात र.रु.२ कोटी कोणत्याही लेखाशिर्षकावर उपलब्ध नाही. तरी याकामी विभागातील उपलब्ध लेखाशिर्षक चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च यावरुन र.रु.५० लाख इतकी रकम नव्याने मागणी केलेल्या सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत. या नविन लेखाशिर्षकावर वर्ग करणे योग्य राहिल. उर्वरित र.रु.१.५० कोटी इतकी रकम बांधकामाच्या प्रमाणात सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या तरतुदींतुन देणे योग्य राहील.उपरोक्त प्रस्तावास अनुसरुण खालील नमुद मुद्ये मा.स्थायी समिती सभे मार्फत मा. महापालिका सभेकडे मंजुरी कामी पाठविणे योग्य राहील.

१. सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत हे नविन लेखाशिर्षक तयार करणे.

२. चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च या लेखाशिर्षकावरुन र.रु.५० लाख नविन लेखाशिर्षकावर वर्ग करणे.

३. सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी निधी मा.उप आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे यांच्या नावे अदा करणेकामी मान्यता देणेस तसेच सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध या ठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून एक डॉक्टर व एक प्रतिनिधी ठेवणेस तसेच भोसरी या ठिकाणी पाळीव प्राणी, जनावरे यांचेसाठी अद्यावत पशुवैद्यकीय दवाखाना उभारण्यास मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा. उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा, अशी सूचना मी मांडतो.

मा. केशव घोळवे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ७६३ विषय क्रमांक - २

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.मनपा आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०४/कावि/४३/२०२१ दि.०३/१२/२०२१

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०८५३ दि.१५/१२/२०२१

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा .

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.फुगे भिमाबाई व मा.बुर्डे सुवर्णा यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११००७ दि.२९/१२/२०२१

कर्नल संदीप चहल ,कमांडिंग ऑफिसर आर्मी रोविंग नोड, एफ कोंबॅट,कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग सी.एम.इ.पुणे ४११०३१ यांनी दि.२९ डिसेंबर २०२१ च्या पत्रान्वये, दि.३ ते दि.९ जानेवारी २०२२ या काळात होणा-या 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 करिता ARMY ROWING NODE(ARN) CME PUNE यांनी म.न.पा.कडून सहआयोजकत्व म्हणून ५०० खेळाडू चहा, अल्पोपहार, भोजन खर्च या खर्चासाठी सहाय्य र.रु.१२,२५,०००/- व वाहतूक खर्च र.रु.२,००,०००/- असे एकूण र.रु.१४,२५,०००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख पंचवीस हजार फक्त) मिळणे कामी विनंती केली असून त्यांनी आगाऊ र.रु.५,००,०००/-मिळणेकामी कळविले आहे. सदर पत्रात त्यांनी

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 अनुषंगाने सहआयोजकत्व स्विकारल्यानंतर दोघांमध्ये आर्मी रोविंग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या मध्ये क्रीडा संबध वाढतील.यामुळे पिंपरी चिंचवड क्षेत्रात नवोदित रोअर्स तयार होण्यास मार्ग खुला होईल.

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 अनुषंगाने सहआयोजकत्व स्विकारल्यानंतर आर्मी रोविंग नोड दरवर्षी म.न.पा.शालेय विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यास तयार आहेत. असे कळविले आहे.

आर्मी रोविंग नोड,एफ कोंबॅट,कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग सी.एम.इ.पुणे ४११०३१ हि संस्था केंद्र सरकारची संस्था असून सदर संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून आर्मी रोविंग नोड,एफ कोंबॅट,कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग सी.एम.इ.पुणे ४११०३१ यांना नियमितपणे STP मधून प्रक्रिया केलेला पाणी पुरवठा केला जातो.त्या बदल्यात म.न.पा.स लाखो रुपये उत्पन्न मिळते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 अनुषंगाने सहआयोजकत्व स्विकारल्याने म.न.पा.शालेय किमान २५ विद्यार्थ्यांना ते रोविंगचे प्रशिक्षण देणार असल्याने,भविष्यात रोविंग खेळाडू तयार होण्यास मदत होणार असल्याने त्याचा म.न.पास निश्चितच फायदा होणार आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दिनांक १८/१/२०१४ अन्वये म.न.पा. क्रीडा धोरणास उपसुचनासह मान्यता दिलेली आहे. सदर क्रीडा धोरणातील भाग-१ – ब - विविध क्रीडा स्पर्धा पान क्रमांक ११ अनुक्रमांक (६) मध्ये शासकीय,निमशासकीय सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे – यामध्ये देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आरोग्य संपन्न मनुष्यबळ प्रत्यक्ष/ अप्रत्यक्षरित्या परिणाम करत असतो. राज्यातील प्रत्येक नागरिक सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आबालवृध्द नागरिकांमध्ये आरोग्य संपन्न जीवनाचे महत्व बिंबविण्यासाठी सर्वांगीण विकास साधण्याकरीता क्रीडा स्पर्धा व खेळ यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. शासकीय, निमशासकीय विभाग, साखर कारखाने, सहकारी संस्था, सूत गिरण्या, महामंडळे औद्योगिक प्रतिष्ठाने याठिकाणी कार्यरत कर्मचा-यांसाठी विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन क्रीडा विभागामार्फत करण्यात यावे. कर्मचा-यांची शारीरीक तंदुरूस्ती व कार्यक्षमता वाढीस लागून उत्पादकता वाढीस लागेल. याकामी म.न.पा. परिसरातील कारखाने, कंपन्या, औद्योगिक संस्था यांनी ही स्पर्धा खर्च करण्यासाठी प्रायोजकत्त्व स्विकारणे आवश्यक आहे. स्पर्धा अनुषंगाने त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य व सहभाग असणे आवश्यक आहे. असे नमुद केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ९: नगरपालिका निधी व अन्य निधी नगरपालिका निधी, कलम ८९, नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा - महानगरपालिकेने नगरपालिका निधी मधून करावयाचा खर्च या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त ,फक्त शहरातच केला जाईल परंतु एकूण पालिका सदस्यांपैकी निम्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठींबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे असा खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी शहराच्या बाहेर करता येईल असे नमूद केलेले आहे. सबब, मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ अन्वये म.न.पा. क्रीडा धोरणास उपसुचनासह मान्यता दिलेली आहे. सदर क्रीडा धोरणातील भाग-१ – ब - विविध क्रीडा स्पर्धा पान क्रमांक ११ अनुक्रमांक (६) मध्ये शासकीय, निमशासकीय सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे यामधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ९: नगरपालिका निधी व अन्य निधी नगरपालिका निधी, कलम ८९, नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा यामध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,

प्रकरण ७, ७३(ड) मधील तरतुदीनुसार, 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 AT ARMY ROWING NODE(ARN) CME PUNE करिता म.न.पा.कडून सहआयोजकत्व म्हणून ५०० खेळाडू चहा, अल्पोपहार, भोजनखर्च हा खर्च स्विकारून साहाय्य र.रु.१२,२५,०००/- (अक्षरी र.रु.बारा लाख पंचवीस हजार फक्त) करारनामा करून, अटी व शर्ती शिथिल करून COMMANDING OFFICER, ARMY ROWING NODE यांच्या नावे देणेस व सदरचा खर्च सन २०२१-२२ मध्ये केलेल्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद र.रु.९५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- मा.महापालिका सभा दि.२४/१२/२०२१ च्या सभेमध्ये, महानगरपालिकेच्या अ,ब,क,वर्ग व्यायाम शाळा धोरण तयार तयार करून त्या बाबतचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेच्या एकूण ८६ व्यायाम शाळा असून त्यापैकी ५२ व्यायाम शाळा सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत ३४ व्यायाम शाळा म.न.पा.चा कर्मचारी नेमून म.न.पा.मार्फत व्यायाम शाळा चालविल्या जात आहेत.

ज्या संस्थांनी ५२ व्यायाम शाळा ११ महिने कराराने चालविण्यास घेतलेल्या आहेत, त्या संस्थांनी सदर व्यायाम शाळेत स्वतःचे अद्ययावत व्यायाम साहित्य खरेदी करून व्यायाम शाळा अद्ययावत केलेल्या आहेत. व्यायाम शाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देताना संबंधित संस्थेशी करारनामा करण्यात येत असून सदर करारनाम्या मध्ये मासिक सभासद शुल्क र.रु.१०/- व अनामत र.रु.२५/- याप्रमाणे आकारावी, असे नमूद केलेले आहे. म.न.पा.ने ठरवून दिलेले शुल्क हे फार वर्षापासूनचे असून यामध्ये वाढ करण्यात आलेले नाही.

त्यामुळे सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास घेतलेल्या व्यायाम शाळेच्या संबधित संस्थांनी स्वतःचे अद्ययावत व्यायाम साहित्य खरेदी व्यायाम शाळेत पुरविले असल्याने सभासंदांकडून, मासिक शुल्क र.रु. १०/- व अनामत र.रु.२५/- हे शुल्क संबधित संस्थांना संस्थेला परवडत नाही. त्यामुळे सभासदांकडून व्यायाम शाळेच्या शुल्कात वाढ करणेबाबत सतत मागणी होत आहे.

म.न.पा.च्या ५२ व्यायाम शाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेतलेल्या संस्थापैकी खालील संस्था म.न.पा.च्या व्यायाम शाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेणे ऐवजी ५ वर्षे भाडे कराराने चालविण्यास घेणेस तयार आहेत.

| **अ. क्र.** | **प्रभाग क्र.** | **व्यायामशाळेचे नांव व पत्ता** | **व्यायाम शाळा भाडे कराराने चालविण्यास मागणी करणा-या संस्थेचे नांव** | **म.न.पा.स द्यावयाचे मासिक भाडे र.रु.** |
|---|---|---|---|---|
| १ | १५ | छत्रपती शिवाजी महाराज जलतरण व्यायामशाळा से.नं.२६ जलतरण तलावाजवळ प्राधिकरण निगडी ४४ | नवनाथ मित्र मंडळ आकुर्डी | ७,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १५ | कै.संजय काळे हेल्थ क्लब, से.नं.२७ कै.संजय काळे मैदान प्राधिकरण निगडी ४४ | संग्राम स्पोर्टस क्लब से.नं.२८ प्राधिकरण निगडी ४४ | ७,०००/- |
| ३ | १९ | स्वातंत्र्यवीर सावरकर व्यायामशाळा से.नं.२७,प्राधिकरण निगडी ४४ | कॅपस्टोन स्पोर्टस अँन्ड फिटनेस से. क्र. २७, निगडी ४४ | ७,०००/- |
| ४ | ११ | पोलिस वसाहत व्यायामशाळा कृष्णानगर चिखली | कै.गजानन म्हेत्रे प्रतिष्ठाण चिखली | ७,०००/- |
| ५ | १४ | प्रबोधनकार ठाकरे व्यायामशाळा मोहननगर जलतरण तलाव जवळ चिंचवड ४११०१९ | अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण चिंचवड | ७,०००/- |
| ६ | १० | कै.सदाशिव बहिरवाडे व्यायामशाळा कै.सदाशिव बहिरवाडे मैदान शाहुनगर,चिंचवड | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ७ | १३ | कै.मधुकर पवळे व्यायामशाळा आण्णा भाऊ साठे क्रीडांगण यमुनानगर निगडी ४४ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ८ | १७ | छत्रपती शाहू महाराज व्यायाम शाळा  प्रेमलोक पार्क,पोलिस आयुक्त कार्यालय जवळ चिंचवड३३ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ९ | २० | संत तुकारामनगर व्यायामशाळा वल्लभनगर पिंपरी १८ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| १० | २० | राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन महिला व्यायामशाळा, संत तुकारामनगर पिंपरी १८ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ११ | १३ | कै.मिनाताई ठाकरे महिला व्यायामशाळा कै.प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल यमुनानगर, निगडी ४४ | क्रांतिवीर मित्र मंडळ, यमुनानगर,निगडी | ७,०००/- |
| १२ | १३ | कै.बिंदुमाधव ठाकरे व्यायामशाळा यमुनानगर, निगडी | क्रांतिवीर मित्र मंडळ ,यमुनानगर,निगडी | ७,०००/- |
| १३ | १४ | कै.आकाश काळभोर व्यायामशाळा, काळभोरनगर, आकुर्डी | हिंदुस्थान रिलाएबल स्पोटर्स क्लब, काळभोरनगर | ७,०००/- |

सबब, वरील तक्त्यात नमूद म.न.पा.च्या १३ व्यायाम शाळेसमोर नमूद केलेल्या संस्था अ वर्ग म्हणून  व्यायाम शाळा ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास घेणेस तयार असून, त्या बदल्यात त्यांनी दरमहा मासिक वर्गणी र.रु. ५००/- ते र.रु.६००/- सभासदांकडून आकारण्यास परवानगी मागितली असून, व्यायाम शाळेचे वीज बिल, पाणी बिल ते स्वतः भरण्यास तयार असल्याचे व म.न.पा. नियमानुसार अटी व शर्तीस अधीन राहून ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास घेण्यास तयार असल्याने, वरील प्रमाणे १३ व्यायाम शाळा त्यांचे नावापुढे नमूद केलेल्या संस्थांना दरमहा मासिक भाडे

र.रु.७,०००/- म.न.पा.कडून आकारून, या भाडेदरात दर ३ वर्षांनी १० % भाडेवाढ करून, तसेच भविष्यात इतरही ज्या संस्थांची, अ वर्ग व्यायाम शाळा ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास घेणेस मागणी असेल अशा संस्थांनाही संबधित, वरील प्रमाणे व्यायाम शाळा भाडे आकारून व म.न.पा. नियमानुसार अटी व शर्तीस अधीन राहून ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत यावी.

मा.उत्तम केंदळे – मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब उपसूचना स्विकारली आहे.

मा.मंगला कदम – मा. महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा सभागृह, विषय क्र.८ हा व्यायाम शाळेचा विषय आहे, त्याला ही उपसूचना द्यावी. ज्या त्या विषयाला उपसूचना द्यावी, विषयांतर कशाला करता.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा सभागृह विषय क्र.३ हा राष्ट्रीय रोविंग चॅम्पीयनशीप संदर्भातील आहे, पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा झालेल्या आहेत, आणि हा विषय क्रिडाशी संबंधित असलने यास ही उपसूचना बसते, त्यामुळे हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर – विषय क्रमांक ३ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरूस्त ठराव मतास टाकणेस आला असता-.

ठराव क्रमांक - ७६४ विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.फुगे भिमाबाई व मा.बुर्डे सुवर्णा यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११००७ दि.२९/१२/२०२१

कर्नल संदीप चहल ,कमांडिंग ऑफिसर आर्मी रोविंग नोड, एफ कोंबॅट, कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग सी.एम.इ.पुणे ४११०३१ यांनी दि.२९ डिसेंबर २०२१ च्या पत्रान्वये, दि.३ ते दि.९ जानेवारी २०२२ या काळात होणा-या 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 करिता ARMY ROWING NODE(ARN) CME PUNE यांनी म.न.पा.कडून सहआयोजकत्व म्हणून ५०० खेळाडू चहा, अल्पोपहार, भोजन खर्च या खर्चासाठी सहाय्य र.रु.१२,२५,००० -/ व वाहतूक खर्च र.रु.२,००,००० -/असे एकूण र.रु.१४,२५,०००) -/ (अक्षरी र.रु.चौदा लाख पंचवीस हजार फक्त) मिळणे कामी विनंती केली असून त्यांनी आगाऊ र.रु.५,००,०००-/ मिळणेकामी कळविले आहे .सदर पत्रात त्यांनी

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 अनुषंगाने सहआयोजकत्व स्विकारल्यानंतर दोघांमध्ये आर्मी रोविंग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या मध्ये क्रीडा संबध वाढतील.यामुळे पिंपरी चिंचवड क्षेत्रात नवोदित रोअर्स तयार होण्यास मार्ग खुला होईल.

२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 39th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 अनुषंगाने सहआयोजकत्व स्विकारल्यानंतर आर्मी रोविंग नोड दरवर्षी म.न.पा.शालेय विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यास तयार आहेत .असे कळविले आहे .

आर्मी रोविंग नोड,एफ कोंबॅट,कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग सी.एम.इ.पुणे ४११०३१ हि संस्था केंद्र सरकारची संस्था असून सदर संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आहे .पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून आर्मी रोविंग नोड,एफ कोंबॅट,कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग सी.एम.इ.पुणे ४११०३१ यांना नियमितपणे STP मधून प्रक्रिया केलेला पाणी पुरवठा केला जातो.त्या बदल्यात म.न.पा.स लाखो रुपये उत्पन्न मिळते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 39th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 अनुषंगाने सहआयोजकत्व स्विकारल्याने म.न.पा.शालेय किमान २५ विद्यार्थ्यांना ते रोविंगचे प्रशिक्षण देणार असल्याने,भविष्यात रोविंग खेळाडू तयार होण्यास मदत होणार असल्याने त्याचा म.न.पास निश्चितच फायदा होणार आहे .मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दिनांक १८/१/२०१४ अन्वये म.न.पा .क्रीडा धोरणास उपसुचनासह मान्यता दिलेली आहे. सदर क्रीडा धोरणातील भाग-१ – ब - विविध क्रीडा स्पर्धा पान क्रमांक ११ अनुक्रमांक) ६ (मध्ये शासकीय, निमशासकीय सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे – यामध्ये देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आरोग्य संपन्न मनुष्यबळ प्रत्यक्ष /अप्रत्यक्षरित्या परिणाम करत असतो .राज्यातील प्रत्येक नागरिक सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे .आबालवृध्द नागरिकांमध्ये आरोग्य संपन्न जीवनाचे महत्व बिंबविण्यासाठी सर्वांगीण विकास साधण्याकरीता क्रीडा स्पर्धा व खेळ यांचे महत्व अनन्यसाधारण आहे . शासकीय, निमशासकीय विभाग, साखर कारखाने, सहकारी संस्था, सूत गिरण्या, महामंडळे औद्योगिक प्रतिष्ठाने याठिकाणी कार्यरत कर्मचा-यांसाठी विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन क्रीडा विभागामार्फत करण्यात यावे. कर्मचा-यांची शारीरीक तंदुरूस्ती व कार्यक्षमता वाढीस लागून उत्पादकता वाढीस लागेल .याकामी म.न.पा .परिसरातील कारखाने, कंपन्या, औद्योगिक संस्था यांनी ही स्पर्धा खर्च करण्यासाठी प्रायोजकत्त्व स्विकारणे आवश्यक आहे .स्पर्धा अनुषंगाने त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य व सहभाग असणे आवश्यक आहे .असे नमुद केलेले आहे .महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ९ : नगरपालिका निधी व अन्य निधी नगरपालिका निधी, कलम ८९, नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा - महानगरपालिकेने नगरपालिका निधी मधून करावयाचा खर्च या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त ,फक्त शहरातच केला जाईल परंतु एकूण पालिका सदस्यांपैकी निम्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठींबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे असा खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी शहराच्या बाहेर करता येईल असे नमूद केलेले आहे . सबब, मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ अन्वये म.न.पा .क्रीडा धोरणास उपसुचनासह मान्यता दिलेली आहे .सदर क्रीडा धोरणातील भाग-१ – ब - विविध क्रीडा स्पर्धा पान क्रमांक ११ अनुक्रमांक) ६ (मध्ये शासकीय, निमशासकीय सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील

कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे यामधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ९ :नगरपालिका निधी व अन्य निधी नगरपालिका निधी, कलम ८९, नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा यामध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ७, ७३(ड) मधील तरतुदीनुसार, 39 th SENIOR NATIONAL ROWING CHAMPIONSHIP 2022 AT ARMY ROWING NODE(ARN) CME PUNE करिता म.न.पा.कडून सहआयोजकत्व म्हणून ५०० खेळाडू चहा, अल्पोपहार, भोजनखर्च हा खर्च स्विकारून साहाय्य र.रु.१२,२५,०००) -/अक्षरी र.रु.बारा लाख पंचवीस हजार फक्त (करारनामा करून, अटी व शर्ती शिथिल करून COMMANDING OFFICER, ARMY ROWING NODE यांच्या नावे देणेस व सदरचा खर्च सन २०२१-२२ मध्ये केलेल्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद र.रु.९५,००,००० -/मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा दि.२४/१२/२०२१ च्या सभेमध्ये, महानगरपालिकेच्या अ,ब,क,वर्ग व्यायाम शाळा धोरण तयार तयार करून त्या बाबतचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेच्या एकूण ८६ व्यायाम शाळा असून त्यापैकी ५२ व्यायाम शाळा सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत ३४ व्यायाम शाळा म.न.पा.चा कर्मचारी नेमून म.न.पा.मार्फत व्यायाम शाळा चालविल्या जात आहेत.

ज्या संस्थांनी ५२ व्यायाम शाळा ११ महिने कराराने चालविण्यास घेतलेल्या आहेत, त्या संस्थांनी सदर व्यायाम शाळेत स्वतःचे अद्ययावत व्यायाम साहित्य खरेदी करून व्यायाम शाळा अद्ययावत केलेल्या आहेत. व्यायाम शाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देताना संबंधित संस्थेशी करारनामा करण्यात येत असून सदर करारनाम्या मध्ये मासिक सभासद शुल्क र.रु.१०/- व अनामत र.रु.२५/- याप्रमाणे आकारावी, असे नमूद केलेले आहे.म.न.पा.ने ठरवून दिलेले शुल्क हे फार वर्षापासूनचे असून यामध्ये वाढ करण्यात आलेले नाही.

त्यामुळे सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास घेतलेल्या व्यायाम शाळेच्या संबधित संस्थांनी स्वतःचे अद्ययावत व्यायाम साहित्य खरेदी व्यायाम शाळेत पुरविले असल्याने सभासंदांकडून, मासिक शुल्क र.रु. १०/- व अनामत र.रु.२५/- हे शुल्क संबधित संस्थांना संस्थेला परवडत नाही. त्यामुळे सभासदांकडून व्यायाम शाळेच्या शुल्कात वाढ करणेबाबत सतत मागणी होत आहे.

म.न.पा.च्या ५२ व्यायाम शाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेतलेल्या संस्थापैकी खालील संस्था म.न.पा.च्या व्यायाम शाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेणे ऐवजी ५ वर्षे भाडे कराराने चालविण्यास घेणेस तयार आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | व्यायामशाळेचे नांव व पत्ता | व्यायाम शाळा भाडे कराराने चालविण्यास मागणी करणा-या संस्थेचे नांव | म.न.पा.स द्यावयाचे मासिक भाडे र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १५ | छत्रपती शिवाजी महाराज जलतरण व्यायामशाळा से.नं.२६ जलतरण तलावाजवळ प्राधिकरण निगडी ४४ | नवनाथ मित्र मंडळ आकुर्डी | ७,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १५ | कै.संजय काळे हेल्थ क्लब, से.नं.२७ कै.संजय काळे मैदान प्राधिकरण निगडी ४४ | संग्राम स्पोर्टस क्लब से.नं.२८ प्राधिकरण निगडी ४४ | ७,०००/- |
| ३ | १९ | स्वातंत्र्यवीर सावरकर व्यायामशाळा से.नं.२७,प्राधिकरण निगडी ४४ | कॅपस्टोन स्पोर्टस अँन्ड फिटनेस से. क्र. २७, निगडी ४४ | ७,०००/- |
| ४ | ११ | पोलिस वसाहत व्यायामशाळा कृष्णानगर चिखली | कै.गजानन म्हेत्रे प्रतिष्ठाण चिखली | ७,०००/- |
| ५ | १४ | प्रबोधनकार ठाकरे व्यायामशाळा मोहननगर जलतरण तलाव जवळ चिंचवड ४११०१९ | अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण चिंचवड | ७,०००/- |
| ६ | १० | कै.सदाशिव बहिरवाडे व्यायामशाळा कै.सदाशिव बहिरवाडे मैदान शाहुनगर,चिंचवड | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ७ | १३ | कै.मधुकर पवळे व्यायामशाळा आण्णा भाऊ साठे क्रीडांगण यमुनानगर निगडी ४४ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ८ | १७ | छत्रपती शाहू महाराज व्यायाम शाळा  प्रेमलोक पार्क,पोलिस आयुक्त कार्यालय जवळ चिंचवड३३ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ९ | २० | संत तुकारामनगर व्यायामशाळा वल्लभनगर पिंपरी १८ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| १० | २० | राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन महिला व्यायामशाळा, संत तुकारामनगर पिंपरी १८ | हनुमान स्पोटर्स अकॅडमी, मोरे वस्ती चिखली पुणे ४११०६२ | ७,०००/- |
| ११ | १३ | कै.मिनाताई ठाकरे महिला व्यायामशाळा कै.प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल यमुनानगर, निगडी ४४ | क्रांतिवीर मित्र मंडळ, यमुनानगर,निगडी | ७,०००/- |
| १२ | १३ | कै.बिंदुमाधव ठाकरे व्यायामशाळा यमुनानगर, निगडी | क्रांतिवीर मित्र मंडळ ,यमुनानगर,निगडी | ७,०००/- |
| १३ | १४ | कै.आकाश काळभोर व्यायामशाळा, काळभोरनगर, आकुर्डी | हिंदुस्थान रिलाएबल स्पोटर्स क्लब, काळभोरनगर | ७,०००/- |

सबब, वरील तक्त्यात नमूद म.न.पा.च्या १३ व्यायाम शाळेसमोर नमूद केलेल्या संस्था अ वर्ग म्हणून  व्यायाम शाळा ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास घेणेस तयार असून, त्या बदल्यात त्यांनी दरमहा मासिक वर्गणी र.रु. ५००/- ते र.रु.६००/- सभासदांकडून आकारण्यास परवानगी मागितली असून, व्यायाम शाळेचे वीज बिल, पाणी बिल ते स्वतः भरण्यास तयार असल्याचे व म.न.पा. नियमानुसार अटी व शर्तीस अधीन राहून ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास घेण्यास तयार असल्याने, वरील प्रमाणे १३ व्यायाम शाळा त्यांचे नावापुढे नमूद केलेल्या संस्थांना दरमहा मासिक भाडे

र.रु.७,०००/- म.न.पा.कडून आकारून, या भाडेदरात दर ३ वर्षांनी १० % भाडेवाढ करून, तसेच भविष्यात इतरही ज्या संस्थांची, अ वर्ग व्यायाम शाळा ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास घेणेस मागणी असेल अशा संस्थांनाही संबधित, वरील प्रमाणे व्यायाम शाळा भाडे आकारून व म.न.पा. नियमानुसार अटी व शर्तीस अधीन राहून ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७६५ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अग्नि/४/कावि/६२४/२०२१, दि. ११/११/२०२१.
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.९ दि.२०/१२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षण विभागाच्या नियंत्रणात मनपाच्या १०५ शाळा आहेत तसेच शहरातील खाजगी शाळांवर नियंत्रण करावे लागते. पुणे महानगरपालिकेचे शिक्षण विभागाची माहिती घेतली असता त्यांच्याकडे क्षेत्रीय कार्यालयानुसार उप प्रशासन अधिकारी (वर्ग २), सहाय्यक प्रशासन अधिकारी (वर्ग २), व पर्यवेक्षक (वर्ग३), अशी पदे कार्यरत आहेत. मनपा व खाजगी शाळा यांची शासनास वेळोवेळी लागणारी माहिती देणे, शाळाची गुणवत्ता वाढविणे, माहिती संकलित करणे इत्यादी कामे मनपाच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत वेळोवेळी तात्काळ करावे लागते. कामकाजामध्ये सुसूत्रता तसेच जलद गतीने निर्णय घेणे करिता प्राथमिक शिक्षण विभागात क्षेत्रीय कार्यालयानुसार खालीलप्रमाणे पदनिर्मिती करून त्यावर नियमानुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या शासन निर्णयानुसार कर्मचारी नियुक्ती करणे आवश्यक आहे.प्राथमिक शिक्षण विभागात १ उप प्रशासन अधिकारी, ८ क्षेत्रीय कार्यालायानुसार ८ व १ मुख्य कार्यालय असे ९ सहाय्यक प्रशासन अधिकारी आवश्यक आहे त्यापैकी १ प्रशासन अधिकारी पद मंजूर असल्याने उर्वरित ८ पदे निर्मिती करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयास २ व मुख्य कार्यालयास २ असे १८ पर्यवेक्षक आवश्यक असून त्यापैकी ७ पदे मंजूर असल्याने

उर्वरित ११ पदे नव्याने निर्मिती करून मंजूर करणे आवश्यक आहे. नवीन पद व जुन्या पदामध्ये वाढीव पदे निर्मिती करणेबाबतची संख्या खालीलप्रमाणे

| **अ.क्र.** | **पदनाम** | **सध्याच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या (१)** | **सुधारीत आकृतीबंधानुसार प्रस्तावित पदसंख्या (२)** | **आवश्यक पदसंख्या (१-२)** |
|---|---|---|---|---|
| १ | उप प्रशासन अधिकारी ( वर्ग २) | ० | १ | १ |
| २ | सहाय्यक प्रशासन अधिकारी ( वर्ग २) | १ | ९ | ८ |
| ३ | पर्यवेक्षक ( वर्ग ३) | ७ | १८ | ११ |

तरी उपरोक्त पदे व संख्या प्राथमिक शिक्षण विभागाकरिता नव्याने निर्मिती करून पदसंखेत वाढ करणेस व त्यास शासन मान्यतेकामी प्रस्ताव सादर करून उमेद मान्यतेवर पदे भरण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मंगला कदम – मा सन्मा.महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा सभागृह हा विषय शिक्षण मंडळाचा आहे, त्याच्यामध्ये पदे भारण्याचा आहेत, परंतु मा.महापौर अशा कितीतरी शाळा आहेत, सध्या शाळा या ऑनलाईन चालतात, परंतु कितीतरी शाळांना मान्यता नाहीत. शाळांना मुख्याध्यापक नाहीत. शाळांना मुख्याध्यापक मिळाले पाहिजे. ऑनलाईन शाळा चालू करायच्या अन शाळांना मुख्याध्यापकच नसल्यास कामकाज कोण बघणार? मा.महापौर आता जी तुम्ही मॅरेथान चालू केलेली आहे, अधिकाऱ्यांचे आकृतीबंध तुम्ही म्हणताय, त्यांचे पदे जशी असतील, त्यांच्या पदाप्रमाणे आयुक्त पद देणारच नाहीत. आयुक्तांना अधिकार आहेत, आम्ही म्हणत नाहीत आयुक्तांना अधिकार नाहीत, परंतु आयुक्तांनी जे उपआयुक्त दर्जाची जी पदं आहेत, ती सहाय्यक आयुक्तांना देतात. तीन –तीन चार्जेस दिलेले आहेत, प्रभाग अधिकाऱ्यांच तसेच केले आयुक्तांनी, ज्या लोकांना प्रभाग अधिकाऱ्याचा चार्ज देता येत नाही अशा लोकांना प्रभाग अधिका-याचे चार्ज दिलेत, का ? उपआयुक्तांच्या बाबतीतही तसेच झाले, सहाय्यक आयुक्तांना ती पदे देत आहेत. त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांचा मान सांभाळता येत नाही मा.महापौर, त्यांच्या काही चुका असतील तर त्यांनी जाहीर कराव्यात ना? जाहीर कराव्यात. उदाहरणार्थ आपल्याकडे प्रशासनामध्ये श्री.इंगळे, आणि आगळे यांच्या बदल्या केल्या, तुम्ही मला सांगा मध्यांतरी इंगळे साहेबांच्या बाबतीत मध्यंतरी मी बोलले होते की त्यांना प्रशासन आणि उद्यान आहे. मग तुम्ही त्यांच डिमोशन कशाला करता, त्यांना पाठवून द्या ना? तुम्ही त्यांना परत पाठवून द्या शासनाकडे पण एखाद्या माणसाच आयुक्तांना आपण खाली आणून बसवले तर चालणार आहे का? नाही चालणार. आयुक्तांनी हे लक्षात घेतल पाहिजे मा.महापौर, की आपण त्यांचे सहकारी आहेत आमचे

नाहीयेत. मा.महापौर साहेब तुमच्याकडे जर महापौर पद आहे, अन् तुम्हाला क्रिडाचे चेअरमन म्हणून बसवले तर चालेल का? तसच आयुक्तांच्या बाबतीत सध्या त्यांच्या त्रीकुटामध्ये जर कुठले लोक बसत नसतील तर ते लोक त्यांचा सन्मान ठेवत नाहीत. की जेणेकरून जरी मागच्या वेळेला झगडे मॅडमकडे कर संकलन होत, त्यांची रिकव्हरी आपण जर पाहिली तर रिकव्हरी चांगली आहे. ५५७ कोटी रिकव्हरी आहेत आता सध्या. मग त्यांना का काढल? त्यांच्या हातात आहे, त्यांची बदली ते कुठेही करू शकतात, याचा अर्थ त्यांच डिमोलेशन नाही करू शकत. या उपआयुक्त अन सहाय्यक आयुक्तांच्या बाबतीत. मागच्या वेळी सुध्दा मी आयुक्तांना सांगितल होतं, की प्रभाग अधिकाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा त्यांनी तसंच केल होत. मग महापालिकेत आमची जी लोक आहेत, त्यांना प्रभाग अधिकारी का करत नाहीत? तुमच्या हातात आहे ना, मग द्याना आमच्या लोकांना सुध्दा पदं. आस करीत नाहीत मा.महापौर साहेब याची दखल घ्यायला पाहिजे. शेवटी कुठलेही असेल कुणीही असेल, आयुक्तांच्या बाबतीत जर आस झालं तर चालणार आहे का? तुमच्या बाबतीत आसं झालं तर चालेल का? तसा कोणत्याही अधिकाऱ्यांचा अपमान होऊ नये, मला काय, दोन्ही काय माझ्या घरचे नाहीत कोणी. पण त्या महिलेचा अपमान होण, डिमोलेशन होणं ही साधी गोष्ट नाहीये. तर त्या दृष्टीकोणातून मा.महापौर आयुक्तांनी लक्षात घेतलं पाहिजे. मा.महापौर तुम्ही पण याबाबत लक्ष द्या. आता मघाशीच मी तुम्हाला म्हटलं होत की आठ नंबरच्या विषयाला तुम्ही व्यायाम शाळेची उपसूचना देऊ शकत होता, तो पण क्रिडाचा विषय होता. परंतु त्या क्रिडामध्ये आपल्याला पंधरा लाख रुपये त्यांना देता येणार आहेत का? मंजूर केलं, केल म्हणजे होणार आहे का ते? तीन लाखापेक्षा आपल्याला परमीशन नाहीये जास्त देण्याची, कसकाय देता येईल पंधरा लाख रुपये? आठ नंबरचा जो विषय आहे, तुम्ही त्याच विषयाला उपसुचना द्या. पंधरा लाख देता येणार आहेत का याचा खुलासा करा. मा.महापौर आजची आणि पुढची एखादी सभा होईल, मा.महापौर तुम्ही लक्ष घाला, आयुक्तांनी त्यांच्या स्वतःच्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खचवायला नाही पाहिजे. तुम्ही लक्ष घाला मा.महापौर या गोष्टीवर, याची दूरूस्ती झाली पाहिजे.

मा.महापौर- मंगलताई तुमच्या भावना सर्वांपर्यंत पोहोचल्या, माझ्यापर्यंत पोहोचल्या, कुणालाही हा आयुक्तांचा निर्णय पटलेला नाहीये. एखाद्याला पदोन्नती द्यावी, पण एखाद्याचे पद काढून त्या अधिकाऱ्याचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अपमान करू नये, आस आयुक्तांना मी सांगू इच्छिते. पुन्हा अशा घटना घडू नयेत, त्यांना पूर्ववत परत आणण्याचा प्रयत्न करावा, याची दुरूस्ती करण्यात यावी, आणि विषय क्रमांक ९ हा मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१ दि. ५/१०/२०२१

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३५ दि.१८/११/२०२१ अन्वये.

४) मा.महापालिका सभा ठराव क्र.७४८ दि.२४/१२/२०२१ अन्वये

मा.महापालिका सभा ठराव क्र. ६९६ दि.२०/०९/२०२१ अन्वये यांत्रिकीकरणाद्वारे साफसफाईचा विषय प्रशासकीय मान्यतेकामी माहे ऑक्टोबर महिन्याचे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जुन्या आरएफपी मधील ४ पॅकेज ऐवजी २ पॅकेजमध्ये शहरातील रस्त्यांची विभागणी करुन सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यास व खर्चामध्ये कपात करुन यंत्रे आणि मनुष्यबळाची फेररचना करण्यात यावी असेही ठरावामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आरएफपी मसुद्यामध्ये बदल करुन सुधारित आरएफपी तयार करण्यात आलेला असून आरएफपी मध्ये असलेली रचना व खर्च यामध्ये बदल झालेला आहे. नविन आरएफपी मसुद्यामध्ये असलेल्या करण्यात आलेला बदलांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सदर कामकाजाकरिता नियुक्त सल्लागार संस्था मे.टंडन अर्बनन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यात आलेला असून त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची २ भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head office व Northern side of head office चे प्रत्येकी १ पॅकेज अशा रितीने २ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.

पॅकेज क्र. १ करिता ३३१ किमी व पॅकेज क्र. २ करिता ३३९.१५ किमी, इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length)६७०.१५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी. पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या वाहनांची व मनुष्यबळा बाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**Package 1: - Southern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

**Package 2: - Northern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्या करिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे

१) निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु. ३६२.०४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्ष खर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.

३) निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आरएफपी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींच्या अथवा प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा. उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा, अशी सूचना मी मांडतो.

मा.कुंदन गायकवाड - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ७७१ विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१ दि. ५/१०/२०२१

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३५ दि.१८/११/२०२१ अन्वये.

४) मा.महापालिका सभा ठराव क्र.७४८ दि.२४/१२/२०२१ अन्वये

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ११

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र जनि/इ/११०७२/२५०/२०२१ दि.२२/१२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील भोसरी परिसरातील स्पाईन रस्त्याच्या दक्षिण भागातील सर्व निवासी क्षेत्र औदयोगिक क्षेत्र तसेच दिघी, भोसरी, चक्रपाणी वसाहत, सद्गुरूनगर परीसरातील मैलापाणी सुमारे ७ ते ९ किमी अंतरावरील कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्राकडे मैलाशुद्धीकरणासाठी येते.

दिघी व भोसरीच्या पुर्व भागातील सर्व मैलापाणी भोसरी स.नं. २१७ येथील पंपिंग स्टेशनला ग्रेविटीने येते तेथून सुमारे १२०० मीटर अंतरावरील स.नं.२३१ येथील पंपिंग स्टेशनला Rising main पाईप लाईन द्वारे येते व तेथे ग्रेविटी व पंपिंगमुळे आलेले सर्व मैलापाणी पुढे आदिनाथनगर मधील (PS1) पंपींग स्टेशन मध्ये पुन्हा पंपिंग करून येते व पुढे ८५० मी. पुणे-नाशिक हायवे वरील PS-2 येथे पुन्हा पंपींगद्वारे येते व B.P.T मधुन ३१०० मी. अंतरावरील कासारवाडी STP येथे शुद्धीकरणासाठी पाठविणेत येते. सदरचा प्रवास अंदाजे ७ ते ९ किलोमीटर असा होतो. यामध्ये मैलापाणी घेऊन येणेसाठी नागरी भागाची व्याप्ती लक्षात घेता सुसूत्रिकरण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच नागरी भागातील दैनंदिन स्वरूपातील कचरा ड्रेनेजमध्ये ब-याच अंशी टाकला जातो व तो कचरा ब-

याच अंतरापर्यंत वाहत येऊन अंतर जास्त असलेमुळे नलिका वारंवार भरतात. तसेच अंतर वाढल्यामुळे नलिका देखील खूप खोलीवर तसेच मोठया आकाराच्या टाकाव्या लागतात.

यासर्व परिस्थितीचे अवलोकन केले असता पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी कमी क्षमतेचे STP विकसित केले तर त्या ठिकाणी जमा होणा-या मैला पाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रीयापुर्ण झालेले पाणी नैसर्गिक नाल्यास सोडणे शक्य आहे.

याच धर्तीवर स.नं.२१७ येथे ५ MLD क्षमतेचे STP चे काम सुरु आहे. यामुळे दिघी, भोसरी पुर्व भागातील नागरीकांची सोय होणार असुन आरोग्य विषयक तक्रारी कमी होणार आहे.

चक्रपाणी वसाहत, महादेवनगर, सद्‌गुरुनगर, भोसरी, धावडेवस्ती या नागरी क्षेत्रातील मैलापाणी भोसरी गावठाण मार्गे आदिनाथ नगर (PS1) या भागात नाल्यामधून पाईपलाईन द्वारेवाहुन नेण्यात येते व याठिकाणी पावसाळा कालावधी मध्ये मोठया प्रमाणात नागरीकांच्या घरामध्ये मैलापाणी शिरते. तसेच नाल्यामधील ड्रेनेजलाईन देखभाल व दुरूस्ती करणे अत्यंत जिकिरीचे होते. त्यामुळे वरील नागरी भागातील मैलापाणी कै. अंकुशराव लांडगे नाटयगृह शेजारील उदयानास लागून उपलब्ध मोकळया जागेत ५MLD क्षमतेचा STP विकसित करुन व  शुद्धीकरण केलेले पाणी सहल केंद्रामधील उदयानास वापरणे तसेच नाटयगृहामधील नाल्यास जोडून तळयामध्ये सोडणेत यावे असा या विभागाचा प्रस्ताव आहे. त्यामुळे आदिनाथनगर मधील नाल्यामध्ये या भागामधील ड्रेनेजचे पाणी बंद होणार असून नाल्यामधील पाईपलाईन हटविणे शक्य होणार आहे.

सदर कामाचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून सदर बांधकामासाठी पुढील १५ वर्षांची वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन ५ MLD क्षमतेच्या STP च्या प्रकल्पासाठी सुमारे ४०००चौ.मी. इतके क्षेत्र आवश्यक आहे, सदरचे क्षेत्र कै. अंकुशराव लांडगे प्रेक्षागृहा मधील नाल्याच्या बाजुस असलेल्या मनपाच्या ताब्यातील विना वापराच्या मोकळया जागेत उपलब्ध होवू शकते तसेच त्यासाठी बाजुच्या उदयानाचा विनावापराचा काही भाग घेता येवू शकतो, त्यास अनुसरून सदरच्या प्रकल्पाचे बांधकामासाठी ठोबळ अंदाजपत्रक तयार केले असून त्यास सुमारे अंदाजे र.रू. १३.१५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०२१-२२चे अंदाजपत्रकात विषयांकीत कामाचा अंतर्भाव नसल्याने विषयांकीत कामास प्रशासकीय मान्यतेकामी मा.महापालिका सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे व सोबतच्या प्रपत्र १ नुसार तरतूद करणेकामी चालु आर्थिक वर्षाच्या नियोजीत भांडवली कामामधून वाढ घट करावी लागणार असुन सन २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रकात तसेच सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करून काम करणे शक्य होणार आहे. सदरच्या प्रकल्पासाठी आवश्यक ४००० चौ.मी. क्षेत्र सद्यस्थितीमध्ये मनपाच्या ताब्यातील विना वापरातील अंकुशराव लांडगे सभागृहामधील नाल्याच्या बाजुकडील तसेच भोसरी सहल केंद्राच्या पूर्वेकडील विनावापराचा काही भाग ताब्यात घेवून उपलब्ध होवू शकते.

सबब, मनपाच्या ताब्यातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृहाच्या बाजुची तसेच भोसरी केंद्राच्या पूर्वेकडील विनावापराची सुमारे ४००० चौ.मी. इतक्या जागेवर ५.० एम.एल.डी. क्षमतेच्या मैलाशुद्धीकरण केंद्र (STP) बांधणे तसेच सदर जागेवर ५.० एम.एल.डी. क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र (STP) विकसित करणे कामाचा सन २०२१/२२ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश करून अंदाजपत्रकीय रक्कम रु.१३.१५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो - राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63 (3) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये विषयांकीत कामास मा. आयुक्त सो. यांनी खालिलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क', क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रामधील मनपा शाळा, इमारती तसेच मनपाने ताब्यात घेतलेल्या शासनाच्या तसेच खाजगी इमारतीमध्ये विलगीकरण कक्ष तसेच कोवीड केअर सेंटर / रुग्णालय उभारणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून सदर इमारतीमध्ये “कोरोना”(COVID-19) केअर सेंटर तसेच कोवीड रुग्नालयासाठी वातानुकुलन यंत्रणा बसविणे व सदर यंत्रणेचे, रोहित्रसंचाचे चालन देखभाल दुरूस्ती करणे CCTV यंत्रणा बसविणे, विद्युतीकरण करणे, तात्पुरत्या स्वरुपात जनित्रसंच बसविणे, व इतर विद्युतविषयक कामाकरिता विद्युत विभागामार्फत निविदा प्रसिद्ध करणेत आली आहे.

सबब खालील कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | क्षेत्रिय कार्यालय | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय / प्रशासकीय मान्यता रक्कम | सन २०२१-२२ ची मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील जम्बो कोविड डेडीकेटेड हॉस्पिटल येथे तात्पुरत्या स्वरूपात वाढीव वातानुकुलन यंत्रणा बसविणे व सदर यंत्रणेचे, रोहित्रसंचाचे चालन देखभाल दुरूस्ती करणे व | क क्षेत्रिय विद्युत विभाग | कोरोना निधी | १७४०००० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अनुषंगिक कामे करणे.(२०२१-२०२२) | | | | |
| २ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम डेडिकेटेड कोविड रुग्नालय तसेच विविध कोविड केअर सेंटर, लसीकरण केंद्र, चाचणी केंद्रांकरीता आवश्यक विद्युतविषयक कामे करणे. | क क्षेत्रिय विद्युत विभाग | कोरोना निधी | ९२००००० | ० |

सबब वरील कामांचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १० मोरवाडी येथे आयटीआयची इमारत आहे. सदरची इमारत वापरासाठी अपुरी पडत असल्याने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर विस्तारीकरण करून सुमारे ५ ते ६ हजार चौ. फूट बांधकाम क्षेत्र उपलब्ध होऊ शकणार आहे.

मनपाचे स्थापत्य विभागाकडील सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात या कामाचा समावेश आहे. सदर "विशेष योजना" या लेखाशिर्षावर र. रु. १०००/- तरतूद शिल्लक असल्याने याकामी पुरेशी तरतूद उपलब्ध करून द्यावी लागणार आहे.

सबब अंदाजपत्रक पुस्तक क्र. २ मध्य भांडार विभागाकडील पान क्र. १८४-१८५ अ. क्र. १५ मधील लेखाशिर्ष "यंत्र सामुग्री व कच्चा माल खरेदी" त्यामधून अंदाजपत्रक पुस्तक क्र. ३ स्थापत्य विभागाकडील पान क्र. ५३ अ. क्र. ११३ मधील "शाळा मैदाने आणि क्रीडा संकुल उभारणे व दुरूस्ती करणे (विशेष योजना)" या लेखाशिर्षात प्रभाग क्र. १० येथील मोरवाडी आयटीआय इमारतीचे विस्तारीकरण करणे या कामासाठी वाढ/ घट र.रु. १,००,००,०००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच स्थापत्य प अंदाजपत्रक इतर विशेष योजना, (झोनिपु स्थापत्य विभाग) भांडवली अंदाजपत्रकामध्ये (५) मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे, सौंदर्यीकरण करणे, व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुषंगिक कामे करणे हे लेखाशिर्ष निर्माण करणेस मान्यता देणेत यावी. भारत सरकार व्दारे राष्ट्रीय स्तरावर स्वच्छ भारत अभियान राबविणेत येत आहे, त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका भाग घेत असते त्यामध्ये आपले मनपाचे सादरीकरण चांगले प्रकारे करणेसाठी मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे, सौंदर्यीकरण करणे, व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे, सद्यस्थितीत झोनिपु विभागाकडील असलेल्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष व तरतुद उपलब्ध नाही.

सबब सदरचे लेखाशिर्ष व त्यावर तरतुद करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे "मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे, सौंदर्यीकरण करणे, व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुषंगिक कामे करणे" हे लेखाशिर्ष स्थापत्य प अंदाजपत्रक इतर विशेष योजना, (झोनिपु स्थापत्य विभाग) भांडवली अंदाजपत्रकामध्ये निर्माण करणेत यावे व सदर लेखाशिर्षावर झोनिपु स्थापत्य विभागातील भांडवली अंदाजपत्रकातील इतर झोपडपट्टीवासींयासाठी सुधारणा करणे या लेखाशिर्षामधील अखर्चित तरतुदीतून र.रू.९० लक्ष इतकी तरतुद उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी, त्याप्रमाणे वर्गीकरण करणे आणि सदर रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र २१, पिंपरी येथील एच.बी. ब्लॉक व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉक्रिटीकरण करणे या कामात स्थळबदल करणेस मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र २१, पिंपरी येथील एच.बी. ब्लॉक व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉक्रिटीकरण करणेचे काम प्रगतीपथावर आहे. पिंपरी येथील १८ मी. डि.पी. रस्त्यावर (जलतरण तलाव रस्ता) अमृत योजनेअंतर्गत १२०० मी.मी. व्यासाची जलनिःसारण नलिका टाकणेचे काम करणेत आले होते. सुमारे १८ ते २० फुट खोलीवर लाईन टाकणेत आली असलेमुळे १८ मी. रस्त्याची दुरावस्था झाली आहे. नागरीकांना ये-जा करणेसाठी त्रास होत असून नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर रस्त्याची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मा.महापालिका समिती सभा ठराव क्र ६०, दि. २९/०७/२०२१ अन्वये विषयांकीत कामामधून वाघेरे कॉलनी १,२ व ३ चे कॉक्रिटीकरण करणेबाबत ठराव संमत झाला आहे. परंतु १८ मी. डि.पी. रस्त्याचे काम करणे आत्यावश्यक असलेमुळे वाघेरे कॉलनी १,२ व ३ ऐवजी १८.मी. डी.पी. रस्त्याचे सुधारणा कामे करून डांबरीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मध्ये खालील प्रकल्प/चौक नव्याने विकसित झाला असून, नागरिकांना पत्ता माहित होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | ठिकाणाचे /प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| 1. | सर्वे नं 35 मधील मिडास टच समोर व वंदे मातरम सोसायटी शेजारील रोडच्या चौकास नाव देणे. | पवार वस्ती चौक, डूडूळगांव. |
| 2. | आरक्षण क्र.2/65 स्मशानभूमीस नाव देणे. | इंद्रायणी धाम स्मशानभूमी चऱ्होली बु. |

तरी वरील प्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच मनपाच्या प्रभाग क्र.३० दापोडी सीएमई गेट समोरील ग्रेडसेपरेटरला अद्याप नाव देणेत आलेले नाही. तरी मा. ह प्रभाग समिती ठराव क्रमांक ०८ दि. ०६/०१/२०२२ अन्वये मा. ह प्रभाग समितीची शिफारस विचारात घेता नुकत्याच हेलिकॅप्टर दुर्घटनेत शहिद झालेले चिफ ऑफ डिफेन्स जनरल बिपिन रावत यांचे नाव या ग्रेडसेपरेटरला देण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच मोशी चऱ्होली प्रभाग क्र.३ ई प्रभाग मोशी गट क्र. ६९१ येथे उभारण्यात आलेल्या भाजी मंडईला श्री नागेश्वर महाराज उपबाजार समिती संचलित कै. अमोल संजय बोराटे भाजी मंडई असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मध्ये शिवतेजनगर परिसरात पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत मनपास रितसर हस्तांतरीत करणेत आलेल्या मोकळी जागा क्र २१ येथे स्थापत्य विभागामार्फत बांधणेत आलेल्या सांस्कृतीक भवनाचे इमारतीचे कै. सिंधुताई सपकाळ सांस्कृतीक भवन व ग्रंथालय असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र १ चिखली मध्ये आरक्षण क्र १/९९ येथे मनपा मार्फत विकसीत करणेत आलेल्या शाळा इमारतीचे माजी नगरसेविका स्व. अलकाताई बाळासाहेब यादव असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र १ चिखली येथील मनपा विकास आराखड्यात नमुद आरक्षण क्र. १/९६ येथे स्थापत्य विभागामार्फत ५०० आसन क्षमतेचे अद्यावत सोई सुविधांनी सुसज्य असे नाट्यगृह (टाऊन हॉंल) विकसीत करणेत येत असून सदर इमारतीचे स्व. अलकाताई निवृत्ती शेलार नाट्यगृह असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मधील स्पाईन रोड ते महाबली चौक रस्त्यास भारत माता मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच गुलाबनगर दापोडी येथे महानगरपालिकेच्या वतीने नव्याने विकसित करण्यात आलेल्या सांस्कृतिक भवनास राष्ट्रीय कॅरमपटु स्व. सागर बोरडे असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच मौजे दापोडी गाव येथील सदर नमूद कामी दोन्ही व्यक्तींनी दापोडीगावच्या सर्वांगीण विकासासाठी बहुमूल्य योगदाना प्रित्यर्थ समस्त दापोडी ग्रामस्थांच्या आग्रहाखातर “बॉम्बे कॉलनी” हे नामफलक वगळून सदर मार्गाला व प्रवेशद्वाराला “श्रीमती रत्नाबाई तुकाराम काटे कॉलनी” व शितळादेवी चौकाच्या पूर्वेला सिद्धी टॉवर रेसीडेंशियल प्रोजेक्टच्या सीमा भिंतीला लागून, जो मार्ग पूर्व-पश्चिम रेल्वे लाईन च्या सीमाभिंती पर्यंत च्या मार्गाला व प्रवेशद्वाराला “कै. श्री. पै. ज्ञानोबा उर्फ माउली (अण्णा) सोपानराव काटे मार्ग” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यात व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास फेरबदलाचा प्रस्ताव सादर करणे आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच मा. सर्वोच्च न्ययालयाचे आदेशानुसार बैलगाडा शर्यतींचे अयोजन करणेबाबत मान्यता मिळालेली आहे. सद्याच्या येणा-या काळात गावोगावी होणा-या गाव जत्रा व बैलगाडा शर्यतींचे अयोजन होणार आहे. तरी भोसरी विधानसभा मतदार संघातील खालील बैलगाडा घाटांचे स्थापत्य विभागातील सद्या चालू असलेल्या कामामधून प्रत्येक घाटासाठी रक्कम रूपये 25,00,000/- पर्यंतचा खर्च वर्गीकरण करून घाटांची तातडीने दुरूस्ती व सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत यावी.

1. तळवडे येथील बैलगाडा घाट
2. चिखली येथील बैलगाडा घाट
3. मोशी येथील बैलगाडा घाट
4. च-होली येथील बैलगाडा घाट
5. भोसरी येथील बैलगाडा घाट

6. जाधववाडी येथील बैलगाडा घाट

तसेच महानगरपालीकेच्या सन 2022-23 च्या नविन अंदाजपत्रकामध्ये वरील प्रत्येक घाटासाठी स्टेडियम पध्दतीने बैठक व्यवस्था करणे व बैलांना इजा होवू नये म्हणून सिमाभिंत बांधणे इत्यादी स्थापत्य विषयक कामांचा समावेश करून या कामांना भरीव तरतुद करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र १५ वहातुक नगरी येथील प्लॉट के ३६ च्या बाजुला आतील रस्त्याला स्व. राधेश्यामजी आग्रवाल यांचे नाव देण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.८ मधील खालील प्रमाणे विविध नामकरणास मान्यता देणेत यावी.

१) पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर 1 मोकळा भूखंड क्रमांक ३ येथे निर्भयाच्या धर्तीवर उद्यान विकसित करण्यात येणार आहे. सदर उद्यानास "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज निर्भया उद्यान व बहुउद्देशीय हॉल सेक्टर 1" तसेच (2) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सेक्टर ३ येथे आंतरराष्ट्रीय स्केटींग ग्राउंड समोरील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी उद्यान विकसित करून मनपाच्या ताब्यात आलेल्या सदर उद्यानास "भारतरत्न माजी पंतप्रधान अटलटबिहारी वाजपेयी उद्यान सेक्टर 3" तसेच (3) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सेक्टर 4 येथे साईनाथ हॉस्पिटल शेजारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी उद्यान विकसित करून मनपाच्या ताब्यात आलेल्या सदर उद्यानास "श्री स्वामी विवेकानंद उद्यान सेक्टर 4" तसेच (4) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर 4 मोकळा भूखंड क्रमांक --- यथे "जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र व उद्यान सेक्टर 4" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा. कुंदन गायकवाड - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो - प्रभाग क्र.२५ वाकड येथील काळाखडक ते वाकड पोलीस स्टेशनकडे जाणारा विकास आराखड्यातील २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे (निविदा ७७/०३/२०१८-१९) हे काम सध्यस्थितीत चालू आहे सदर कामामधील काही भाग हा मनपा च्या ताब्यात देणेसाठी जागा मालक विरोध करीत असलेमुळे तेथे काम करता येत नाही. त्यामुळे सदर कामामध्ये काही रक्कम ही शिल्लक राहत आहे. प्रभाग क्र.२५ मध्ये ब-याच रस्त्यांची पावसामुळे दुरावस्था झालेली असल्यामुळे तेथील नागरिक डांबरीकरण करून देणेसाठी वारंवार मागणी करीत आहे. तरी उपरोक्त कामातील शिल्लक रक्कमेमधून प्रभाग क्र. २५ मध्ये ठिकठिकाणी डांबरीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळ बदलाच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. २५ वाकड येथील भुजबळ वस्ती मधून वाकडकर वस्ती मार्गे भुमकरवस्ती येथील हिंजवडीकडे एम.डी.आर. ३१ रस्त्याला जोडणारा ३०.०० मी. रूंद डी.पी. रस्ता विकसीत करणे (नि.नो.क्र.७७/०२/२०१८-२०१९) हे काम सद्यस्थितीत चालू आहे. सदर कामामधील काही भाग हा मनपाच्या ताब्यात देणेसाठी जागा मालक विरोध करीत असलेमुळे तेथे काम करता येत नाही. त्यामुळे

सदर कामामध्ये काही रक्कम ही शिल्लक राहत आहे. प्रभाग क्र.२५ मध्ये ब-याच रस्त्यांची पावसामुळे दुरावस्था झालेली असल्यामुळे तेथील नागरिक डांबरीकरण करून देणेसाठी वारंवार मागणी करीत आहे. तरी उपरोक्त कामातील शिल्लक रकमेमधून प्रभाग क्र. २५ मध्ये ठिकठिकाणी डांबरीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळ बदलाच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच मौजे सांगवी येथील सांगवी बोपोडी येथे मुळा नदीवरील पूल बांधणेकामी मौजे सांगवी येथील स.नं.३ पैकी जागेतून ३० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नरवि/१७/७६/२०१९ दिनांक १९/१२/२०१९ रोजी घोषित करणेत आलेला आहे. सदर रस्ता पुणे व पिंपरी चिंचवड शहरास जोडण्याच्या पुलासाठी आवश्यक असल्याने त्यांचे भूसंपादन होणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने The Right To Fair Compensation And Transparency In Land Acqauistion, Rehabilitation Resettlement ACT २०१३ हा नवीन कायदा दिनांक ०१ जानेवारी २०१४ पासून अमलात आलेला आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित रस्त्याखालील जमीन म.प्रा.व.न.अ. १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी. मा.महापालिका सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता उपरोक्त ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

मा. राजू मिसाळ - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, उपसूचनां स्वीकारल्या आहेत.

मा.महापौर – विषय क्रमांक ११ उपसूचनांसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ७७२ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र जनि/इ/११०७२/२५०/२०२१ दि.२२/१२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील भोसरी परिसरातील स्पाईन रस्त्याच्या दक्षिण भागातील सर्व निवासी क्षेत्र औदयोगिक क्षेत्र तसेच दिघी, भोसरी, चक्रपाणी वसाहत, सद्गुरूनगर परीसरातील मैलापाणी सुमारे ७ ते ९ किमी अंतरावरील कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्राकडे मैलाशुद्धीकरणासाठी येते.

दिघी व भोसरीच्या पुर्व भागातील सर्व मैलापाणी भोसरी स.नं. २१७ येथील पंपिंग स्टेशनला ग्रेविटीने येते तेथून सुमारे १२०० मीटर अंतरावरील स.नं.२३१ येथील पंपिंग स्टेशनला Rising main पाईप लाईन द्वारे येते व तेथे ग्रेविटी व पंपिंगमुळे आलेले सर्व मैलापाणी पुढे आदिनाथनगर मधील (PS1) पंपींग स्टेशन मध्ये पुन्हा पंपिंग करून येते व पुढे ८५० मी. पुणे-नाशिक हायवे वरील PS-2 येथे पुन्हा पंपींगद्वारे येते व B.P.T मधुन ३१०० मी. अंतरावरील कासारवाडी STP येथे शुद्धीकरणासाठी

पाठविणेत येते. सदरचा प्रवास अंदाजे ७ ते ९ किलोमीटर असा होतो. यामध्ये मैलापाणी घेऊन येणेसाठी नागरी भागाची व्याप्ती लक्षात घेता सुसूत्रिकरण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच नागरी भागातील दैनंदिन स्वरूपातील कचरा ड्रेनेजमध्ये ब-याच अंशी टाकला जातो व तो कचरा ब-याच अंतरापर्यंत वाहत येऊन अंतर जास्त असलेमुळे नलिका वारंवार भरतात. तसेच अंतर वाढल्यामुळे नलिका देखील खूप खोलीवर तसेच मोठया आकाराच्या टाकाव्या लागतात.

यासर्व परिस्थितीचे अवलोकन केले असता पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी कमी क्षमतेचे STP विकसित केले तर त्या ठिकाणी जमा होणा-या मैला पाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रीयापुर्ण झालेले पाणी नैसर्गिक नाल्यास सोडणे शक्य आहे.

याच धर्तीवर स.नं.२१७ येथे ५ MLD क्षमतेचे STP चे काम सुरु आहे. यामुळे दिघी, भोसरी पुर्व भागातील नागरीकांची सोय होणार असुन आरोग्य विषयक तक्रारी कमी होणार आहे.

चक्रपाणी वसाहत, महादेवनगर, सद्गुरुनगर, भोसरी, धावडेवस्ती या नागरी क्षेत्रातील मैलापाणी भोसरी गावठाण मार्गे आदिनाथ नगर (PS1) या भागात नाल्यामधून पाईपलाईन द्वारेवाहुन नेण्यात येते व याठिकाणी पावसाळा कालावधी मध्ये मोठया प्रमाणात नागरीकांच्या घरामध्ये मैलापाणी शिरते. तसेच नाल्यामधील ड्रेनेजलाईन देखभाल व दुरूस्ती करणे अत्यंत जिकिरीचे होते. त्यामुळे वरील नागरी भागातील मैलापाणी कै. अंकुशराव लांडगे नाटयगृह शेजारील उदयानास लागून उपलब्ध मोकळया जागेत ५MLD क्षमतेचा STP विकसित करुन व शुद्धीकरण केलेले पाणी सहल केंद्रामधील उदयानास वापरणे तसेच नाटयगृहामधील नाल्यास जोडून तळयामध्ये सोडणेत यावे असा या विभागाचा प्रस्ताव आहे. त्यामुळे आदिनाथनगर मधील नाल्यामध्ये या भागामधील ड्रेनेजचे पाणी बंद होणार असून नाल्यामधील पाईपलाईन हटविणे शक्य होणार आहे.

सदर कामाचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून सदर बांधकामासाठी पुढील १५ वर्षांची वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन ५ MLD क्षमतेच्या STP च्या प्रकल्पासाठी सुमारे ४०००चौ.मी. इतके क्षेत्र आवश्यक आहे, सदरचे क्षेत्र कै. अंकुशराव लांडगे प्रेक्षागृहा मधील नाल्याच्या बाजुस असलेल्या मनपाच्या ताब्यातील विना वापराच्या मोकळया जागेत उपलब्ध होवू शकते तसेच त्यासाठी बाजुच्या उदयानाचा विनावापराचा काही भाग घेता येवू शकतो, त्यास अनुसरून सदरच्या प्रकल्पाचे बांधकामासाठी ठोबळ अंदाजपत्रक तयार केले असून त्यास सुमारे अंदाजे र.रू. १३.१५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०२१-२२चे अंदाजपत्रकात विषयांकीत कामाचा अंतर्भाव नसल्याने विषयांकीत कामास प्रशासकीय मान्यतेकामी मा.महापालिका सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे व सोबतच्या प्रपत्र १ नुसार तरतूद करणेकामी चालु आर्थिक वर्षाच्या नियोजीत भांडवली कामामधून वाढ घट करावी लागणार असुन सन २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रकात तसेच सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करून काम करणे शक्य होणार आहे. सदरच्या प्रकल्पासाठी आवश्यक ४००० चौ.मी. क्षेत्र सद्यस्थितीमध्ये मनपाच्या ताब्यातील विना वापरातील अंकुशराव लांडगे सभागृहामधील नाल्याच्या

बाजुकडील तसेच भोसरी सहल केंद्राच्या पूर्वेकडील विनावापराचा काही भाग ताब्यात घेवून उपलब्ध होवू शकते.

सबब, मनपाच्या ताब्यातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृहाच्या बाजुची तसेच भोसरी केंद्राच्या पूर्वेकडील विनावापराची सुमारे ४००० चौ.मी. इतक्या जागेवर ५.० एम.एल.डी. क्षमतेच्या मैलाशुद्धीकरण केंद्र (STP) बांधणे तसेच सदर जागेवर ५.० एम.एल.डी. क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र (STP) विकसित करणे कामाचा सन २०२१/२२ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश करून अंदाजपत्रकीय रक्कम रु.१३.१५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63 (3) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये विषयांकीत कामास मा. आयुक्त सो. यांनी खालिलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क', क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रामधील मनपा शाळा, इमारती तसेच मनपाने ताब्यात घेतलेल्या शासनाच्या तसेच खाजगी इमारतीमध्ये विलगीकरण कक्ष तसेच कोवीड केअर सेंटर / रुग्णालय उभारणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून सदर इमारतीमध्ये "कोरोना"(COVID-19) केअर सेंटर तसेच कोवीड रुग्नालयासाठी वातानुकुलन यंत्रणा बसविणे व सदर यंत्रणेचे, रोहित्रसंचाचे चालन देखभाल दुरूस्ती करणे CCTV यंत्रणा बसविणे, विद्युतीकरण करणे, तात्पुरत्या स्वरुपात जनित्रसंच बसविणे, व इतर विद्युतविषयक कामाकरिता विद्युत विभागामार्फत निविदा प्रसिद्ध करणेत आली आहे.

सबब खालील कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | क्षेत्रिय कार्यालय | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय / प्रशासकीय मान्यता रक्कम | सन २०२१-२२ ची मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील जम्बो कोविड डेडीकेटेड हॉस्पिटल येथे तात्पुरत्या स्वरूपात वाढीव वातानुकुलन यंत्रणा बसविणे व सदर यंत्रणेचे, रोहित्रसंचाचे चालन देखभाल दुरूस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे.(२०२१-२०२२) | क क्षेत्रिय विद्युत विभाग | कोरोना निधी | १७४००००० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम डेडिकेटेड कोविड रुग्नालय तसेच विविध कोविड केअर सेंटर, लसीकरण केंद्र, चाचणी केंद्रांकरीता आवश्यक विद्युतविषयक कामे करणे. | क क्षेत्रिय विद्युत विभाग | कोरोना निधी | ९२००००० | ० |

सबब वरील कामांचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १० मोरवाडी येथे आयटीआयची इमारत आहे. सदरची इमारत वापरासाठी अपुरी पडत असल्याने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर विस्तारीकरण करून सुमारे ५ ते ६ हजार चौ. फूट बांधकाम क्षेत्र उपलब्ध होऊ शकणार आहे.

मनपाचे स्थापत्य विभागाकडील सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात या कामाचा समावेश आहे. सदर "विशेष योजना" या लेखाशिर्षावर र. रु. १०००/- तरतूद शिल्लक असल्याने याकामी पुरेशी तरतूद उपलब्ध करून द्यावी लागणार आहे.

सबब अंदाजपत्रक पुस्तक क्र. २ मध्य भांडार विभागाकडील पान क्र. १८४-१८५ अ. क्र. १५ मधील लेखाशिर्ष "यंत्र सामुग्री व कच्चा माल खरेदी" त्यामधून अंदाजपत्रक पुस्तक क्र. ३ स्थापत्य विभागाकडील पान क्र. ५३ अ. क्र. ११३ मधील "शाळा मैदाने आणि क्रीडा संकुल उभारणे व दुरूस्ती करणे (विशेष योजना)" या लेखाशिर्षात प्रभाग क्र. १० येथील मोरवाडी आयटीआय इमारतीचे विस्तारीकरण करणे या कामासाठी वाढ/ घट र.रु. १,००,००,०००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच स्थापत्य प अंदाजपत्रक इतर विशेष योजना, (झोनिपु स्थापत्य विभाग) भांडवली अंदाजपत्रकामध्ये (५) मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे, सौंदर्यीकरण करणे, व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुषंगिक कामे करणे हे लेखाशिर्ष निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे. भारत सरकार व्दारे राष्ट्रीय स्तरावर स्वच्छ भारत अभियान राबविणेत येत आहे, त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका भाग घेत असते त्यामध्ये आपले मनपाचे सादरीकरण चांगले प्रकारे करणेसाठी मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे, सौंदर्यीकरण करणे व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे, सद्यस्थितीत झोनिपु विभागाकडील असलेल्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष व तरतुद उपलब्ध नाही.

सबब सदरचे लेखाशिर्ष व त्यावर तरतुद करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे “मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे, सौंदर्यीकरण करणे, व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुषंगिक कामे करणे” हे लेखाशिर्ष स्थापत्य प अंदाजपत्रक इतर विशेष योजना, (झोनिपु स्थापत्य विभाग) भांडवली अंदाजपत्रकामध्ये निर्माण करणेत यावे व सदर लेखाशिर्षावर झोनिपु स्थापत्य विभागातील भांडवली अंदाजपत्रकातील इतर झोपडपट्टीवासीयांसाठी सुधारणा करणे या लेखाशिर्षामधील अखर्चित तरतुदीतून र.रू.९० लक्ष इतकी तरतुद उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास

मान्यता देणेत येत आहे त्याप्रमाणे वर्गीकरण करणे आणि सदर रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र २१, पिंपरी येथील एच.बी. ब्लॉक व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे या कामात स्थळबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र २१, पिंपरी येथील एच.बी. ब्लॉक व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणेचे काम प्रगतीपथावर आहे. पिंपरी येथील १८ मी. डि.पी. रस्त्यावर (जलतरण तलाव रस्ता) अमृत योजनेअंतर्गत १२०० मी.मी. व्यासाची जलनिःसारण नलिका टाकणेचे काम करणेत आले होते. सुमारे १८ ते २० फुट खोलीवर लाईन टाकणेत आली असलेमुळे १८ मी. रस्त्याची दुरावस्था झाली आहे. नागरीकांना ये-जा करणेसाठी त्रास होत असून नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर रस्त्याची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मा.महापालिका समिती सभा ठराव क्र ६०, दि. २९/०७/२०२१ अन्वये विषयांकीत कामामधून वाघेरे कॉलनी १,२ व ३ चे कॉंक्रिटीकरण करणेबाबत ठराव संमत झाला आहे. परंतु १८ मी. डि.पी. रस्त्याचे काम करणे आत्यावश्यक असलेमुळे वाघेरे कॉलनी १,२ व ३ ऐवजी १८.मी. डी.पी. रस्त्याचे सुधारणा कामे करून डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मध्ये खालील प्रकल्प/चौक  नव्याने विकसित झाला असून, नागरिकांना पत्ता माहित होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे /प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| 1. | सर्वे नं 35 मधील मिडास टच समोर व वंदे मातरम सोसायटी शेजारील रोडच्या चौकास नाव देणे. | पवार वस्ती चौक, डूडूळगांव. |
| 2. | आरक्षण क्र.2/65 स्मशानभूमीस नाव देणे. | इंद्रायणी धाम स्मशानभूमी चऱ्होली बु. |

तरी वरील प्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपाच्या प्रभाग क्र.३० दापोडी सीएमई गेट समोरील ग्रेडसेपरेटरला अद्याप नाव देणेत आलेले नाही. तरी मा. ह प्रभाग समिती ठराव क्रमांक ०८ दि. ०६/०१/२०२२ अन्वये मा. ह प्रभाग समितीची शिफारस विचारात घेता नुकत्याच हेलिकॅप्टर दुर्घटनेत शहिद झालेले चिफ ऑफ डिफेन्स जनरल बिपिन रावत यांचे नाव या ग्रेडसेपरेटरला देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मोशी चऱ्होली प्रभाग क्र.३ ई प्रभाग मोशी गट क्र. ६९१ येथे उभारण्यात आलेल्या भाजी मंडईला श्री नागेश्वर महाराज उपबाजार समिती संचलित कै. अमोल संजय बोराटे भाजी मंडई असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मध्ये शिवतेजनगर परिसरात पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत मनपास रितसर हस्तांतरीत करणेत आलेल्या मोकळी जागा क्र २१ येथे स्थापत्य विभागामार्फत बांधणेत आलेल्या सांस्कृतीक भवनाचे इमारतीचे  कै. सिंधुताई सपकाळ सांस्कृतीक भवन व ग्रंथालय  असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र १ चिखली मध्ये आरक्षण क्र १/९९ येथे मनपा मार्फत विकसीत करणेत आलेल्या शाळा इमारतीचे माजी नगरसेविका स्व. अलकाताई बाळासाहेब यादव असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र १ चिखली येथील मनपा विकास आराखड्यात नमुद आरक्षण क्र. १/९६ येथे स्थापत्य विभागामार्फत ५०० आसन क्षमतेचे अद्यावत सोई सुविधांनी सुसज्य असे नाट्यगृह (टाऊन हॉल) विकसीत करणेत येत असून सदर इमारतीचे स्व. अलकाताई निवृत्ती शेलार नाट्यगृह असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मधील स्पाईन रोड ते महाबली चौक रस्त्यास भारत माता मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच गुलाबनगर दापोडी येथे महानगरपालिकेच्या वतीने नव्याने विकसित करण्यात आलेल्या सांस्कृतिक भवनास राष्ट्रीय कॅरमपटु स्व. सागर बोरडे असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे दापोडी गाव येथील सदर नमूद कामी दोन्ही व्यक्तींनी दापोडीगावच्या सर्वांगीण विकासासाठी बहुमूल्य योगदाना प्रित्यर्थ समस्त दापोडी ग्रामस्थांच्या आग्रहाखातर “बॉम्बे कॉलनी” हे नामफलक वगळून सदर मार्गाला व प्रवेशद्वाराला “श्रीमती रत्नाबाई तुकाराम काटे कॉलनी” व शितळादेवी चौकाच्या पूर्वेला सिद्धी टॉवर रेसीडेंशियल प्रोजेक्टच्या सीमा भिंतीला लागून, जो मार्ग पूर्व-पश्चिम रेल्वे लाईन च्या सीमाभिंती पर्यंत च्या मार्गाला व प्रवेशद्वाराला “कै. श्री. पै. ज्ञानोबा उर्फ माउली (अण्णा) सोपानराव काटे मार्ग” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यात व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास फेरबदलाचा प्रस्ताव सादर करणेस मा.आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मा. सर्वोच्च न्ययालयाचे आदेशानुसार बैलगाडा शर्यतींचे अयोजन करणेबाबत मान्यता मिळालेली आहे. सद्याच्या येणा-या काळात गावोगावी होणा-या गाव जत्रा व बैलगाडा शर्यतींचे अयोजन होणार आहे. तरी भोसरी विधानसभा मतदार संघातील खालील बैलगाडा घाटांचे स्थापत्य विभागातील सद्या चालू असलेल्या कामामधून प्रत्येक घाटासाठी रक्कम रूपये 25,00,000/- पर्यंतचा खर्च वर्गीकरण करून घाटांची तातडीने दुरूस्ती व सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

1. तळवडे येथील बैलगाडा घाट
2. चिखली येथील बैलगाडा घाट
3. मोशी येथील बैलगाडा घाट
4. च-होली येथील बैलगाडा घाट
5. भोसरी येथील बैलगाडा घाट
6. जाधववाडी येथील बैलगाडा घाट

तसेच महानगरपालीकेच्या सन 2022-23 च्या नविन अंदाजपत्रकामध्ये वरील प्रत्येक घाटासाठी स्टेडियम पध्दतीने बैठक व्यवस्था करणे व बैलांना इजा होवू नये म्हणून सिमाभिंत बांधणे

इत्यादी स्थापत्य विषयक कामांचा समावेश करून या कामांना भरीव तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र १५ वहातुक नगरी येथील प्लॉट के ३६ च्या बाजुला आतील रस्त्याला स्व. राधेश्यामजी आग्रवाल यांचे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.८ मधील खालील प्रमाणे विविध नामकरणास मान्यता देणेत येत आहे.

(1) पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर 1 मोकळा भूखंड क्रमांक ३ येथे निर्भयाच्या धर्तीवर उद्यान विकसित करण्यात येणार आहे. सदर उद्यानास "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज निर्भया उद्यान व बहुउद्देशीय हॉल सेक्टर 1" तसेच (2) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सेक्टर ३ येथे आंतरराष्ट्रीय स्केटींग ग्राउंड समोरील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी उद्यान विकसित करून मनपाच्या ताब्यात आलेल्या सदर उद्यानास "भारतरत्न माजी पंतप्रधान अटलटबिहारी वाजपेयी उद्यान सेक्टर 3" तसेच (3) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सेक्टर 4 येथे साईनाथ हॉस्पिटल शेजारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी उद्यान विकसित करून मनपाच्या ताब्यात आलेल्या सदर उद्यानास "श्री स्वामी विवेकानंद उद्यान सेक्टर 4" तसेच (4) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर 4 मोकळा भूखंड क्रमांक --- यथे "जगद्‌गुरु संत श्री तुकाराम महाराज जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र व उद्यान सेक्टर 4" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.२५ वाकड येथील काळाखडक ते वाकड पोलीस स्टेशनकडे जाणारा विकास आराखड्यातील २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे (निविदा ७७/०३/२०१८-१९) हे काम सध्यस्थितीत चालू आहे सदर कामामधील काही भाग हा मनपा च्या ताब्यात देणेसाठी जागा मालक विरोध करीत असलेमुळे तेथे काम करता येत नाही. त्यामुळे सदर कामामध्ये काही रक्कम ही शिल्लक राहत आहे. प्रभाग क्र.२५ मध्ये ब-याच रस्त्यांची पावसामुळे दुरावस्था झालेली असल्यामुळे तेथील नागरिक डांबरीकरण करून देणेसाठी वारंवार मागणी करीत आहे. तरी उपरोक्त कामातील शिल्लक रक्कमेमधून प्रभाग क्र. २५ मध्ये ठिकठिकाणी डांबरीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळ बदलाच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. २५ वाकड येथील भुजबळ वस्ती मधून वाकडकर वस्ती मार्गे भुमकरवस्ती येथील हिंजवडीकडे एम.डी.आर. ३१ रस्त्याला जोडणारा ३०.०० मी. रूंद डी.पी. रस्ता विकसीत करणे (नि.नो.क्र.७७/०२/२०१८-२०१९) हे काम सद्यस्थितीत चालू आहे. सदर कामामधील काही भाग हा मनपाच्या ताब्यात देणेसाठी जागा मालक विरोध करीत असलेमुळे तेथे काम करता येत नाही. त्यामुळे सदर कामामध्ये काही रक्कम ही शिल्लक राहत आहे. प्रभाग क्र.२५ मध्ये ब-याच रस्त्यांची पावसामुळे दुरावस्था झालेली असल्यामुळे तेथील नागरिक डांबरीकरण करून देणेसाठी वारंवार मागणी करीत आहे. तरी उपरोक्त कामातील शिल्लक रकमेमधून प्रभाग क्र. २५ मध्ये ठिकठिकाणी डांबरीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळ बदलाच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे सांगवी येथील सांगवी बोपोडी येथे मुळा नदीवरील पूल बांधणेकामी मौजे सांगवी येथील स.नं.३ पैकी जागेतून ३० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नरवि/१७/७६/२०१९ दिनांक १९/१२/२०१९ रोजी घोषित करणेत आलेला आहे. सदर रस्ता पुणे व पिंपरी चिंचवड शहरास जोडण्याच्या पुलासाठी आवश्यक असल्याने त्यांचे भूसंपादन होणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने The Right To Fair Compensation And Transparency In Land Acqauistion, Rehabilitation Resettlement ACT २०१३ हा नवीन कायदा दिनांक ०१ जानेवारी २०१४ पासून अमलात आलेला आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित रस्त्याखालील जमीन म.प्रा.व.न.अ. १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. मा. महापालिका सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता उपरोक्त ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**समित्यांचे अहवाल**

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७७३ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्र.२ दि.३/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७७४ विषय क्रमांक - १३

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महीला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्र.२ दि.२५/११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७७५ विषय क्रमांक - १४

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.२ दि. ७/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.३ दि.२१/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७७६ विषय क्रमांक - १५

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

कार्यपत्रिका क्र.२ दि. २६/१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७७७ विषय क्रमांक - १६

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.शिक्षण समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.२ दि. २/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.३ दि.१६/१२/२०२१ व दि. २०/१२/२०२१चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७७८ विषय क्रमांक - १७

दिनांक - २०/०१/२०२२ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र स्था/PMAYप्र/१३/२०२२ दि.१२/१/२०२२

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र स्था/PMAYप्र/१४/२०२२ दि.१२/१/२०२२

मा.महापालिका सभा ठराव क्र.६३२, दि.३१/०३/२०२१ अन्वये सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.

सदरच्या अंदाजपत्रकांतर्गत मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र.१ मधील पान क्र.१८८ वरील अ.क्र.३ प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) या अंतर्गत अंदाजपत्रकातील पान क्र.१९० वरील अ.क्र.४ नुसार मनपा अंदाजपत्रकातून हिस्सा अंतर्गत सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकासाठी र.रु.४९,००,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे.

सदरची तरतुद करताना केंद्र शासन अनुदान, राज्य शासन अनुदान, लाभार्थी हिस्सा व मनपा हिस्सा हे खालीलप्रमाणे प्राप्त होतील असे गृहित धरण्यात आले होते.

(र.रु.लाखात)

| अ.क्र. | अनुदान व रकमा | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | लाभार्थी हिस्सा | मनपा हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंदाजपत्रकानुसार | १४४६.६० | १५४१.२० | १२०६८.३८ | ४९००.०० | १९९५६.१८ |
| २ | प्रत्यक्ष प्राप्त | ०.०० | ८०४.०० | ०.०० | ४९००.०० | ५७०४.०० |
| ३ | तफावत | १४४६.६० | ७३७.२० | १२०६८.३८ | ०.०० | १४२५२.१८ |

सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकानुसार केंद्र शासन अनुदान, राज्य शासन अनुदान, लाभार्थी हिस्सा व मनपा हिस्सा यानुसार र.रु.१९९,५६,१८,०००/- इतकी रक्कम या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि, आज अखेर पर्यंत मनपा फंडातून उपलब्ध करुन दिलेले, राज्य शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान र.रु.५७,०४,००,०००/- प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर जमा झालेले होते. तथापि प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चालु असलेल्या प्रकल्पांवरील देयके अदा केल्यानंतर सदरची रक्कम ही आता संपलेली असून सदर प्रकल्पांच्या पुढील येणाऱ्या देयकांसाठी कोणतेही प्रकारची तरतुद प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर उपलब्ध नसल्याने लेखा विभागामार्फत प्रस्तावित केलेली देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर तरतुद उपलब्ध करुन घेण्यासाठी पुढीलप्रमाणे करण्यात आलेल्या तरतुदींमध्ये वाढ / घट करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | अंदाजपत्रकीय पान क्र.व अ.क्र. | विषय | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०२१-२२ साठीची सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| **सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकातील मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र१ मधील तरतुदीनुसार** | | | | | | |
| **लेखाशिर्ष – प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167)** | | | | | | |
| १ | १९१/ब (१) | पंतप्रधान आवास योजना घटक क्र.१ PCSSIHDP अंतर्गत गुलाबनगर, जयभिम नगर, महात्मा फुले नगर, सिध्दार्थ नगर, महात्मा फुले नगर, सिध्दार्थ नगर, लिंबोरे चाळ दापोडी प्रकल्पांचे पुनर्वसन / पुनर्निर्माण करणे | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| २ | १९१/ब (२) | पंतप्रधान आवास योजना घटक क्र.१ PCSSIHDP अंतर्गत गांधीनगर झोपडपट्टीचे पुनर्वसन / पुनर्निर्माण करणे | ६,००,००,००० | ० | ५,९९,९९,००० | १,००० |
| ३ | १९१/क (१) | पंतप्रधान आवास योजना (पिंपरी वाघेरे आरक्षण क्र.५७) | ५०,००,००० | ० | ४९,९९,००० | १,००० |
| ४ | १९१/क (२) | पंतप्रधान आवास योजना (पिंपरी वाघेरे आरक्षण क्र.१५९) | ५०,००,००० | ० | ४९,९९,००० | १,००० |
| ५ | १९१/३ | महसुली खर्च | १,००,००,००० | ० | ६०,००,००० | ४०,००,००० |
| **सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकातील मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र३ मधील तरतुदीनुसार** | | | | | | |
| **लेखाशिर्ष – पुल व प्रकल्प विभाग (BSUP) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प** | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ५५६/५/१ | अजंठानगर (आकुर्डी स.नं.८८ पैकी) व उद्योगनगर चिंचवड स.नं.१९५ (पैकी) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी १६८० गाळे बांधणे (पॅकेज – १) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| ७ | ५५६/५/२ | वेताळनगर (चिंचवड स.नं.१७४ पैकी) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी १५६८ गाळे बांधणे. (पॅकेज - २) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| ८ | ५५६/५/३ | मिलिंदनगर (पिंपरी स.नं.१२१३) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी १४५६ गाळे बांधणे. (पॅकेज - ३) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| ९ | ५५६/५/४ | निगडी सेक्टर क्र.२२ (अ) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २२४० गाळे बांधणे. (पॅकेज - ५) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| १० | ५५६/५/५ | निगडी सेक्टर क्र.२२ (ब) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २३२० गाळे बांधणे. (पॅकेज - ६) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| ११ | ५५६/५/६ | निगडी सेक्टर क्र.२२ (क) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २४०० गाळे बांधणे. (पॅकेज - ७) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| १२ | ५५६/५/७ | निगडी सेक्टर क्र.२२ (ड) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २४८० गाळे बांधणे. (पॅकेज - ८) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| १३ | ५५६/५/८ | निगडी सेक्टर क्र.२२ (इ) येथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २३२० गाळे बांधणे. (पॅकेज - ९) | १,००,००,००० | ० | ९९,९९,००० | १,००० |
| १४ | ५५७/५/९ | वरील JnNURM मुलभूत सुविधा, अनुषंगिक कामे करणे, सल्लागार सेवा इत्यादी कामे करणे. | २,००,००,००० | ० | १,९९,९९,००० | १,००० |

| लेखाशिर्ष – स्थापत्य (EWS) प्रकल्प विभाग, BSUP EWS | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | ५५७/७/२ | सल्लागार फी | १,००,००,००० | ० | ५०,००,००० | ५०,००,००० |
| १६ | ५५७/७/४ | इतर फी | १,००,००,००० | ० | ७०,००,००० | ३०,००,००० |
| १७ | १८८/३ | प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) | ४९,००,००,००० | १९,७९,८७,००० | ० | ६८,७९,८७,००० |
| एकुण | | | ७०,००,००,००० | १९,७९,८७,००० | १९,७९,८७,००० | ७०,००,००,००० |

वरीलप्रमाणे प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे वाढ / घट करुन प्रस्तावित वाढीची रक्कम सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील तरतुद मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र.१ मधील पान क्र.१८८ वरील अ.क्र.३ प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) या लेखाशिर्षावर वर्ग करणे अत्यावश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये सुचविलेप्रमाणे र.रु. १९,७९,८७,०००/- घट करुन सदरची रक्कम सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील तरतुद मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र.१ मधील पान क्र.१८८ वरील अ.क्र.३ प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मंगला कदम – सन्मा. महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, मा.आयुक्तांनी शहरात जी अनधिकृत बांधकाम चालू आहेत, त्या बांधकामावर सोनवणे वस्ती याठिकाणी फार मोठया प्रमाणावर कारवाई केली. मा.महापौर जवळपास आठ कोटीची इमारत पाडली आहे काल मा.महापौर. मागच्या वेळेस शरदनगरमध्ये कारवाई केली त्या कारवाईमध्ये मा.महापौर तीन चार मजली इमारती पाडली. अक्षरश: तिथे एका माणसाला हार्ट अटॅक आला व तो माणूस मृत्यू मुखी पडला. मा.महापौर साहेब मला आयुक्तांना एक प्रश्न विचारायचा आहे, ऐवढे मोठे नुकसान, एवढया मोठ्या इमारती होई पर्यंत तुम्ही गप्प बसतात आणि ऐवढे मोठे स्ट्रक्चर झाल्यनंतर जर तुम्ही पाडत असाल तर सध्या कोरोनाचा काळ आहे, आज इंडस्ट्री सगळी पॅक आहे, पूर्ण इंडस्ट्री पॅक आहे, आज त्या सोनवणे वस्तीमध्ये गट क्र. दोन जे आहे त्याच्यामध्ये जवळपास चारशे ते साडेचारशे लोकं एक गुंठा/ दोन गुंठ्यात एक ते दीड वर्षे झाली काम करत आहेत. तेथे जवळपास १० हजार कामगार काम करत आहेत. परंतु तुम्ही मला एक सांगा की कालची जी इमारत पाडली ती कमीत कमी आठ ते दहा कोटी पेक्षा जास्त किंमतीची इमारत होती. उद्या त्यांनी दोन नोटीस दिल्या आहेत. आज इंडस्ट्री ऐवढी पॅक असतांना, कोरोनाचा काळ चालू असतांना, सुचना देता का मालकांना? मग यांचे बीट निरीक्षक काय करत होते. अधिकारीवर कारवाई करा बीट निरीक्षकावर कारवाई करा? आहो माणसे मरायला लागलीत, आज तुम्ही मला सांगा कोरोनाच्या काळामध्ये मा.महापौर लोकांकडे पैशाची परिस्थिती अवघड झालेली आहे. मुख्यमंत्री सांगतात की आपल्याला बंद करता येणार नाहीत कुठल्याही गोष्टी, लॉकडाऊन घेता येणार नाही. जर

लॉकडाउन घेता येणार नसेल आज जो तुम्ही असल्या बांधलेल्या इमारती, तुम्ही सील लावा, त्यांचेवर फौजदारी कारवाई करा पण आज ज्या माणसांनी, आज आम्हालाही माहीत नाही कोण ते तीन पार्टनर होते, तीन पार्टनरने बांधली आहे. एक एक, दोन दोन गुंठे जागा घेतलेल्या आहेत आणि त्यावर त्यांनी बांधकाम केलेले आहे. मा.महापौर साहेब तुम्ही शहराचे महापौर आहात, सद्य परिस्थिती मध्ये आयुक्तांना म्हणा की तिथे दहा बांधकामे तुम्ही अशी पाडलेली आहेत की ती बेसमेंट लेवलला पाडली ती लोक कुणी काही बोलली का? कोणी काही म्हणल नाही. फाउंडेशन लेवलला असलेली बांधकामे महापौर साहेब तुम्ही पाडा, आमच काहीही म्हणनं नाही. परंतु एवढ मोठ बांधकाम झाल्यानंतर मला वाटतं तुम्ही सील करा त्या इमारतीला, कार्पोरेशनच्या ताब्यात घ्याना त्या इमारती. आज लोकांच्या एवढ्या तीन-तीन, चार-चार मजले बांधल्यानंतर तुम्ही पाडता आणि अक्षरश: त्या कुटुंबामध्ये एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला त्यला जबाबदार कोण आहे? मागच्या पंधरा दिवसापूर्वी शरदनगरमध्ये कारवाई केली, चार मजली इमारत पाडली, आहो, तो कामगार माणूस होता, पीएफ आणि सगळ फंड काढून, कर्ज काढून त्या माणसाने बांधकाम केले होत. आणि त्या माणसाचा मृत्यू झाला. घरातल्या कर्त्या माणसाचा. कोण जबाबदार आहे याला? आयुक्तांना म्हणाव फाउंडेशन लेवलला असलेली बांधकामे पाडा, बील्डींग सील करुन कार्पोरेशनच्या ताब्यात घ्या, आम्ही म्हणणार नाहीत, आम्ही अनधिकृत बांधकामाला पाठीशी घालत नाहीत. त्या मोठया इमारती सील करुन ताब्यात घ्या. ही कुठली पध्दत, एवढ मोठ बांधकाम झाल्यानंतर, दहा-दहा कोटी खर्च झाल्यानंतर तुम्ही बील्डींग पाडतात तर याला जबाबदार कोण? अधकारी जबाबदार नाहीत का याला? त्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई केली गेली पाहिजे. मा.महापौर आज कोरोनाचा काळ आहे, लोकांना जगण मुश्कील झालेल आहे, कामगारांना पगार मिळत नाहीये, या दृष्टीकोणातून सहानुभूतीपूर्वक विचार केला गेला पाहिजे. आणि यांच्या बीट निरीक्षकांना सांगा कंप्लेशन लेव्हलला असतांना पाडा आमच काहीही म्हणनं नाहीये, मोठया इमारती आहेत, त्यांनाही पाठीशी घालणार नाही, ज्या मोठया इमारती आहेत त्या मनपानी सील करुन ताब्यात घ्याव्यात पण ऐवढ्या मोठयावर जर बुलडोजर फिरवल तर मा.महापौर अक्षरश: सोनवणे वस्ती काल आख्खी रडत होती. या गोष्टीची मा.महापौर गांभीर्याने दखल घ्या आणि आयुक्तांना आदेश द्या की, ज्या इमारती मोठ्या बांधकामे झालेल्या असतील त्यांना सील लावून कार्पोरेशनच्या ताब्यात घ्याव्यात. मा.महापौर यात तुम्ही लक्ष घालावे ही विनंती.

मा.कुंदन गायकवाड - सन्मा. महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, माई आता ज्या काही आमच्या सहकारी नगरसेवक मंगलाताई बोलल्या त्या संदर्भात मला बोलायचं होतं. कारण सोनवणे वस्ती होती, तीथ कारवाई झाली महापौर, मी वारंवार याबाबत आयुक्तांना भेटलो, मी परवा दिवशी पण भेटलो होतो, माई गेल्या पाच ते सहा दिवसापूर्वी कारवाई केली होती, त्यात २० ते २५ पत्रा शेड पाडून टाकले आहेत. तुम्हाला पण विनंती आहे अशी कारवाई करू नका, कारण आज त्या लोकांनी पंधरा वीस शेड तुम्ही पाडली. तुम्ही पहिले त्यांना नोटीशी द्या. पण तुम्ही नोटीसा सुध्दा दिलेल्या नाहीत. आता काल सोनवणे वस्तीला कारवाई चालू आहे, आज पण कारवाई चालू केलेली आहे. कमीत कमी तीन ते साडेतीन कोटी रुपयाचे बांधकामाच नुकसान झालेलं आहे त्याची भरपाई कोण भरणार? मग पहिले तो बीट निरीक्षक, बीट निरीक्षकांनी बांधकाम पायापासून थांबवाव, आज यात चुकी कोणाची आहे. आयुक्त साहेब मला तुम्ही खरंच सांगा ही कारवाई करतांना तुम्हांला किती विनंती केली. माई तुम्ही आयुक्तांवर कारवाई करा. आयुक्त साहेब सूडबुध्दीने ही कारवाई करतात. उदीष्ठ राजकारणाच आहे, आमचे सगळे

नागरीक राहतात ते रेड झोन आहे, त्यांनी करायच काय ? आयुक्तांना सांगूनही ते कारवाई थांबवत नाहीत. मुद्दाम कारवाई करत आहेत. शरदनगरमध्ये ४२ बांधकामे पाडली. त्यांचे फोटो पाहिले ना तर चार-चार मजले इमारती होत्या. मग बीट निरीक्षकांनी पहिल्याच मजल्यावर थांबवली असती बांधकामे तर त्यांचे नुकसान झाले नसते. त्यांनी कर्ज काढून बांधकामे केली होती. अशीच सोनवणे वस्तीला मोठी कारवाई केली, आज पण कारवाई चालू आहे. सूडबुध्दीने कारवाई करतात का आयुक्त साहेब तुम्ही. आम्ही वारंवार तुम्हाला येऊन भेटतोय, एवढी मोठी कारवाई केली ना, ही सुडबुध्दीने कारवाई केलेली आहे आयुक्तांनी. माई तुम्हाला सांगतो याला काहीतरी करा तुम्ही. आता पण शरद नगर, सोनवणे वस्तीला कारवाई चालू आहे.

मा.महापौर – ठीक आहे कुंदन मी आयुक्तांना सांगते, आयुक्त साहेब जो काही मंगलताईनी, कुंदन गायकवाड यांनी जे विषय मांडले ते अतिशय महत्वाचा विषय आहे कोरोनाच्या काळामध्ये तुम्ही अशा प्रकारच्या कारवया सर्वसामान्य लोकांनी एक ते दीड गुंठा जागा घेवून स्वत:चे कुटुंबासाठी जागा कमी पडत असेल म्हणून ते बांधकाम वाढवित असतील तर त्या ठिकाणी आपण करवाई करु नये. आणि आता जे कुंदन गायकवाड म्हणाले आणि मंगलताई ज्या म्हणाल्या त्यांच्या मताशी मी सहमत आहे. आपण मागच्या वेळेस आपण जे बांधकामे पाडायला सांगीतली होती ती पाडली गेली नाहीत, त्यावेळी तुम्ही कोरोनाचा विषय मधी आणला आणि त्यामुळे ते थांबवल गेलं, आता देखील तीसरी लाट चालू आहे. लोकांच्या राहण्याच्या अडचणीचा गैरवापर करून आपण ह्या कारवाया करू नयेत असे मी आपणास आदेश देते. जे कमर्शिअल/ अनधिकृत इमारती असतील त्यांच्याबद्दल आमचं काहीही मत नाहीये. पण सर्व सामान्य लोकांना वेठीस धरु नका.

मा.राहुल जाधव – सन्मा. महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, महापौर साहेब विषय असा आहे, जर आपण बीट निरीक्षक हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी म्हणून नेमले आहेत, त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका त्यांचं वेतन देत असते. खऱ्या आर्थाने ते वेतन काही फुकट घेतात का? जर वेतन घेतात तर कामगीरी पण चोख बजावली पाहिजे. पाया भारणी पासून चार-चार मजले इमारत असेल मोठे कमर्शिअल शेड असेल, किंवा अन्य कोणतेही बांधकाम असेल, हे बांधकाम होत असतांना यांनी काही डोळयावर पट्टी बांधून प्रभागात फिरतात का? त्यांची कामगीरी, त्यांची जाबाबदारी त्यांना कळत नाही का? माझ मत आस आहे माई की यांनी जर जे काम चालू होतय त्या ठिकाणी डोळेझाक न करता त्यांची जबाबदारी बजावत असतांना त्यांनी कोणतेही काम त्या ठिकाणी होऊ द्यायचे नाही आणि त्याठिकाणी जागेवर ते काम थांबवायच, हे यांच काम आहे. परंतु हे दोन-दोन मजले झाले तीन-तीन मजले झाले, त्यानंतर कारवाई करायची, आणि नंतर कॉलर टाईट करायची, आणि म्हणायच, आमच्या अधिपत्याखाली ही कारवाई झाली. नंतर दूसऱ्या दिवशी पेपरला द्यायच, पत्रकारांना द्यायच आणि मीडीयाला द्यायचं की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण विभागाचे वतीने एवढी मोठी कारवाई झाली. काय मोठा डोंगर पालथा घातला नाही. गोर गरीबांची बांधकामे पाडता, आज माझ्या प्रभागात वाघेश्वर कॉलनीमध्ये केंद्रे म्हणून आहेत त्यांच आज बांधकाम पाडल, तीसऱ्या दिवशी त्यांना अटॅक आला आणि त्यांचा मृत्यू झाला. याला जबाबदार कोण? या प्रशासनावर, आयुक्तांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा आणि आसे आदेश तुम्ही द्या. माई हे इतके मोठे पाप कुणाच्या माथ्यावर आहे. खरा विषय असा आहे, आमचा ग्रामीण भाग आहे, काही ठिकाणी ग्रीन

झोन सुध्दा आहे, काही ठिकाणी रेड झोन सुध्दा आहेत, काही ठिकाणी पुररेषा सुध्दा आहेत. परंतु हे सर्व करत असतांना आपल्या बीट निरीक्षकांनी योग्य काम केल तर अशी चुकीची कामे होणार नाहीत आणि त्यामुळे जे कोणी बांधकाम करतय, जे गोरगरीब आहे त्यांचे नुकसान होणार नाही आणि त्यांना पश्चाताप देखील होणार नाही. त्यामुळे तुम्ही सक्त आयुक्तांना आता आदेश द्या की तुमच्या बीट निरीक्षकांनी या ज्या चुका केल्यात पहिल्यांदा त्यांच्यवर आजपर्यंत जे-जे बीट निरीक्षक असेल, जे बांधकाम परवानगीचे अधिकारी असेल यांच्यावर पहिली कारवाई करायची, आसे सक्त आदेश तुम्ही आयुक्तांना द्या मा.महापौर, धन्यवाद.

मा.अभिषेक बारणे – सन्मा. महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, महापौर साहेब आपले शहराचे भौगोलिक परिस्थितीमध्ये बऱ्याचशा भागात रेड झोन आहे, बऱ्याचशा भागात प्राधिकरण आरक्षण आहे. बरेचशे प्लॉट असे आहेत की जे प्लॅन पास होऊ शकत नाही. आर्धा गुंठा -एक गुंठा आहे, त्यांची घरे पाडयला लागली आहेत, आज ती लोक घरं दुरूस्ती करीत आहेत. जी दुरूस्ती करत आहेत त्यांची घरे पडायला लागली आहेत पंधरा-पंधरा वर्षे झाली त्यांची घरे सॅंक्शन होत नाहीत. म्हणून ती लोक दूरूस्त करत आहेत. आपण सर्वांनी मिळून एक पॉलीसी करा महापौर साहेब, कारवाई करीत असतांना रस्त्यात जी बांधकामे येत आहेत, जी गार्डन मध्ये आहेत, जी आरक्षणात आहेत, जे बांधकाम आहे त्यावर तो पाचवा मजला बांधतो, पहिली कारवाई त्यांचेवरती करा. आणि वरचे मजले काढा, परंतु जो माणूस रहायला एक-दोन मजले बांधतोय, त्याचा प्लॅन पास होत नाही म्हणून तो बांधतोय, तिथे प्राधिकरण आरक्षण आहे म्हणून बांधतोय. ज्या शेतकऱ्यांच्या रेड झोनमध्ये जागा गेलेल्या आहेत, त्या रेड झोनचा निकाल लागत नाही म्हणून तो गोडावून बांधतोय. त्यांचे जर रस्त्यात येत असेल ना महापौर साहेब तर निश्चित कारवाई करा, पण रस्त्यात / आरक्षणात त्याच जर काहीच येत नाही त्याच्यावर कारवाई करता तर मा.महापौर हे चुकीचे आहे. आपण कुठल्या बीट निरीक्षकाला मला कुणाला दोष द्यायचा नाहीये, जर तुम्ही समजा चालू बांधकाम काढलं, आज आमचा प्राधिकरण आरक्षणाचा भाग आहे, याठिकाणी एखाद घर दुरूस्त करतोय आणि तुम्ही पाडायला आले तर हे चुकीच आहे. मी स्वत: माझ्या प्रभागात तीसरा चवथा मजला कोणाला बांधू देत नाही. वरचे मजले जर कोणी बांधत असतील तर मी वरचे मजले काढायला लावतो. परंतु राहण्यासाठी मजला दोन मजले बांधतोय, आरक्षणात आहे, प्लॅन पास होत नाही तर त्याच्यावर कृपा करून कारवाई होऊ नये. आयुक्त साहेब जी बांधकामे रस्त्यात आहेत, जी बांधकामे आरक्षणात आहेत त्यावर कारवाई करा आणि मग तुम्ही या घराच्या बांधकामाचा विचार करा. तुम्ही प्लॅन पास करत असाल तर सरसगट कारवाई करा. पण प्राधिकारण आरक्षणात प्लॅन पास होत नाही. आज मागच्या वेळेस तुम्ही जो मुद्दा घेतला आज आपण प्राधिकरणाच्या आरक्षणातल्या जागा एक रूपयात त्याच्या नावावर करणार होतो. असा ठराव केला की जो तिथे राहतो एक रुपयात त्याचे नावाने बांधकाम करा. सदर प्रकरण शासनाकडे पाठवले आहे, शासनाने काय केलं त्याचं? शासनाने काही केलं की नाही केलं? आयुक्त साहेबांना विचारा. आयुक्त यांनी त्याचा किती फॉलोअप घेतला? कधी होणार ती बांधकामं? आज आमचे पक्षनेते नामदेवराव ढाके यांचा वार्ड सुध्दा प्राधिकरण आरक्षणामध्ये आहे. आज पोटतीकीने आम्ही सगळयांनी तो ठराव केला की एक रूपयाध्ये घरे नावावर करून द्या. याचा पाठपुरावा घ्या आणि जो पर्यंत त्याचा पाठपुरावा होत नाही तो पर्यंत प्राधिकरण हद्दीमधल्या एकाही बांधकामावर कारवाई होऊ नये. तीसरा मजला बांधतोय, चवथा मजला बांधतोय, एफएसआयच्या पलीकडे बांधतो आम्हीच दाखवून देतो तुम्ही पाडा. जो राहण्यासाठी बांधतोय, जो २० वर्षापासून तेथे राहतोय, पत्र्याच घर हे तो दूरूस्त करतोय, आता या सगळया यातून काय होणार उद्या

बीट निरीक्षक म्हणाला हा कॉलम मध्ये नाही तर कॉलम मध्येच बांधु. तुम्हाला पाडायचंना तर आरक्षणातल पाडा, रस्त्यातल पाडा, माई हे आदेश तुम्ही सक्तपणे द्या आणि हे आयुक्तांना पण मान्य होईल आसं मला वाटत.

मा.महापौर – आयुक्त साहेब जे काही अभिषेकने, मंगलताईने, कुंदन गायकवाड, माजी महापौर मा.राहुल जाधव यांच्या भावना लक्षात घेवून ज्या पध्दतीच आपल्या समोर त्यांचं म्हणणं आलेल आहे, की बाधित जागेवर बांधकाम असेलतर ते पाडल्यास आमची काही हरकत नाही, परंतु सर्वसमान्य लोकांच्या वाटं जाऊ नये. कोरोना आहे, लोकांच्या नोक-या गेल्यात, पूर्णपणे आर्थिक दृष्टीने कमकुवत झालेली लोक आहेत, शाळेची फी भारण्यासाठी अडचण आलेली आहे. अशा पध्दतीची लोकांची आर्थिक परिस्थिती झालेली आहे, त्याबद्दल आयुक्त साहेब आपण नोंद घ्यावी आणि विषय क्रमांक १७ हा मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

मा.महापौर - सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

-----

**(**उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/ ०१ /२०२२
दिनांक - ०४ /२/२०२२

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील
योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अग्नि/४/कावि/६२४/२०२१, दि.११/११/२०२१)**

## परिशिष्ट – "अ"

(१५ मी. उंचीवरील व ५०० चौ. मी किमान क्षेत्रफळ )

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| अ.क्र. | फायर प्रिमियम चार्जेस ची आकारणी करायचा इमारत उंचीचा टप्पा | फायर प्रिमियम चार्जेस चे सुधारित दर |
| १ | १५ मी. उंचीपर्यंतच्या विशेष वापराच्या विविध प्रकारच्या भोगवटा असणाऱ्या इमारती.<br>अ ) ५०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या इमारती. | अ) रु.५०/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.५०,०००/- ) |
| २ | १५ मी. ते ४० मी. उंचीच्या इमारती | रु.२००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.२,००,०००/- ) |
| ३ | ४० मी. ते ७० मी. उंचीच्या इमारती | रु.५००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.५,००,०००/- ) |
| ४ | ७० मी. ते १०० मी. उंचीच्या इमारती | रु.८००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.८,००,०००/- ) |
| ५ | १०० मी. ते १५० मी. उंचीच्या इमारती | रु.१,०००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.१५,००,०००/- ) |
| ६ | १५० मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारती | रु.१,२००/- प्रती चौ.मी.<br>( किमान रु.२०,००,०००/- ) |

* वरीलप्रमाणे रकाना ३ मध्ये नमूद करण्यात आलेले सुधारित दर हे रकाना २ मध्ये नमूद उंचीच्या टप्प्यातील इमारतीच्या संपूर्ण बांधीव (Gross Builtup )क्षेत्रासाठी लागू होतील.

३०/११/२१

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

# परिशिष्ठ " ब "

[ कलम ३ ( १ ) स्पष्टीकरण व कलम ११ ( १) पहा ] भाग - एक
(१५ मी व त्यावरील उंच व ५०० चौ. मी. क्षेत्रफळ )

| अ.क्र. | इमारतीचा भोगवट्याचा प्रकार | १० ते २५ लाखा लोकसंख्या नसलेली महानगरपालिका | |
|---|---|---|---|
| | | फी प्रति चौ. मी.रुपये | किमान ...... रुपयांच्या अधीन |
| | **निवासी इमारती (मिश्र) निवासी/ लॉजींग/ हॉटेल** | | |
| १ | ० ते २४ मीटर उंचीच्या पर्यंत | ४०.०० | १,००,०००/- |
| २ | २४ ते ३५ मीटर उंचीच्या पर्यंत | ६०.०० | २,००,०००/- |
| ३ | ३५ ते ४५ मीटर उंचीच्या पर्यंत | ८०.०० | ३,००,०००/- |
| ४ | ४५ मीटर पेक्षाअधिक उंचीच्या | १००.०० | ५,००,०००/- |
| | **हॉटेल्स ( क-५)** | | |
| १ | १५ ते ३० मीटर उंचीच्या पर्यंत | ५०.०० | १,५०,०००/- |
| २ | ३० मीटर वरील उंचीच्या | ७५.०० | ३,००,०००/- |
| | **शैक्षणिक इमारती ( ख)** | | |
| १ | १५ ते ३० मीटर उंचीच्या पर्यंत | ८०.०० | ४,००,०००/- |
| | **संस्थेच्या इमारती ( ग)** | | |
| | **रुग्णालये / आरोग्यधाम व शुश्रुग्रह ( ग -१)** | | |
| १ | १५ पेक्षा कमी उंचीच्या | | |
| | ( एक) १००० चौ. मी.पेक्षा कमी भूखंड क्षेत्राच्या,तळमजला अधिक एक मजला असलेल्या व खाटा नसलेल्या | ४०.०० | ५०,०००/- |
| | ( दोन) १००० चौ. मी.पेक्षा कमी भूखंड क्षेत्राच्या,तळमजला अधिक एक मजला असलेल्या व खाटा असलेल्या | ६०.०० | ७५,०००/- |
| | (तीन) दोन मजल्यापेक्षा अधिक मजले असलेल्या व खाटा नसलेल्या | ७०.०० | १,००,०००/- |
| | (चार ) दोन मजल्यापेक्षा अधिक मजले असलेल्या व खाटा असलेल्या | ८०.०० | १,२५,०००/- |
| २ | १५ ते २४ मीटर उंचीच्या पर्यंत | ९०.०० | ३,००,०००/- |
| ३ | २४ मीटर अधिक उंचीच्या | १२०.०० | ५,००,०००/- |
| | **अभिरक्षार्थ ( ग-२) व शिक्षार्थ व प्लेन्टल ( ग-३)** | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | १००.०० | १,५०,०००/- |
| २ | २४ ते ३०मी. उंची पर्यंत | १२०.०० | २,००,०००/- |
| | **समाज मंदिरे ( घ )** | | |
| | **( घ-१ ते घ -५ )** | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | ११०.०० | १,७५,०००/- |
| २ | २४ ते ३०मी. उंची पर्यंत | १२५.०० | २,२५,०००/- |
| | **व्यावसायिक इमारती ( ड )** | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | ८०.०० | १,५०,०००/- |
| २ | २४ मी. वरील उंचीच्या | १००.०० | ३,००,०००/- |
| | **वाणिज्यिक इमारती ( च )** | | |
| | **( च-१ व च -५ )** | | |
| १ | १५ ते २४ मी. उंची पर्यंत | ८०.०० | २,००,०००/- |
| २ | २४ ते ३०मी. उंची पर्यंत | १२०.०० | ४,००,०००/- |
| | **अति धोक्याच्या ( छ -३)** | | |
| १ | ( पाच ) ५०० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या | १८०.०० | ३,००,०००/- |
| ख ) | धोकादायक वायू व पेट्रोलीयम पदार्थ वाहून नेणारे क्षेत्रपार ( cross country ) नळ मार्ग | २००.०० प्रति मीटर | ५,००,०००/- |
| | **गोदामे ( ज )** | | |
| १. | १५ मीटर उंची पर्यंतच्या | | |
| | ( एक ) एक मजली इमारत | ८०.०० | ५०,०००/- |
| | ( दोन ) तळमजला अधिक एक मजला | १००.०० | ७५,०००/- |
| २. | तळमजला अधिक एकाहून अधिक मजले | २५.०० | १,००,०००/- |

30/11/21

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

## परिशिष्ठ " क "
## उदयोग धंदा, व्यवसाय व अन्य सेवा अग्निशमन सेवा शुल्क रचना

| "ब" उद्योगधंदा / व्यवसाय (Business) (वापर ना हरकत दाखले ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यवसाय प्रकार | | नाहरकत दाखला शुल्क (प्रतीवर्षी १०% वाढ) | | नुतनीकरण शुल्क / वर्ष |
| १ | मंगल कार्यालये / लग्न कार्यालये | | र.रु २०/- प्रति. चौ.मी. किमान र.रु ३०,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| २ | सिनेमागृहे/ प्रेक्षागृहे/ मल्टीप्लेक्स | | र.रु २५,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ३ | धोकादायक पदार्थ ट्रेंडींग दुकाने | | र.रु ५०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ५ | धोकादयक गोदामे/स्क्रॅप गोदामे | | र.रु ८,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ६ | पेट्रोल पंप (डिझेल, गॅस ई.) | | र.रु १२,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ७ | एल.पी.जी गोडावून / एजन्सीज | | र.रु. १०,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ८ | एल.पी.जी / सि.एन.जी. रेटिक्युलेशन यंत्रणा (प्रति बँक) - | | | | |
| अ | निवासी इमारती | | र.रु. ८,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | बिगर निवासी / अथवा मिश्र इमारती | | र.रु.१५,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ९ | लाकुड वखार | | र.रु.३,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| १० | रॉकेल साठा व विक्री - | | | | |
| अ | १००० लिटर. मर्यादा( किरकोळ विक्री ) | | र.रु.५,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | १००० लिटर ते २५००० लिटर पर्यंत | | र.रु.१०,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| | टिप : दुकान व रेशन रॉकेल विक्री किरकोळ रॉकेल विक्री म्हणून धरणेत येईल | | | | |
| ११ | हॉटेल | | | | |
| | क्रमांक | क्षेत्रफळ | फक्त हॉटेल | परमीट रुम | नुतनिकरण शुल्क / वर्ष |
| | अ | १० चौ.मी. पर्यंत | र.रु.३,०००/- | र.रु.५,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | ब | ५० चौ.मी. पर्यंत | र.रु.५,०००/- | र.रु.७,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | क | १०० चौ.मी. पर्यंत | र.रु.८,०००/- | र.रु.१०,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | ड | २०० चौ.मी. पर्यंत | र.रु.१०,०००/- | र.रु.१२,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | इ | २०१ चौ.मी.चे पुढे | र.रु.१२,०००/- | र.रु.१४,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | फ | स्टार हॉटेल | र.रु.१४,०००/- | र.रु.१६,०००/- | मुळ शुल्काचे ५० % |
| | टिप :<br>● हॉटेल्समध्ये लॉजिगंची सोय असलेस सरसकट र.रु ७,०००/- जादा शुल्क व वार्षिक नुतनीकरण शुल्क हे मुळ शुल्काचे ५०% या प्रमाणे लागू राहील तथापी, एकुण क्षेत्रफळामध्ये पार्किंगच्या जागेचे क्षेत्रफळ वगळून राहील.<br>● फक्त लॉजिंग व्यवसाय असलेल्या व्यावसायीकांना प्रत्येक रुमसाठी अग्निशमन सेवा शुल्क र.रु ५००/- या प्रमाणे आकारणेत येईल व वार्षिक नुतनीकरणासाठी मुळ शुल्काचे ५०% रक्कम आकारणेत येईल. | | | | |
| १२ | सायबर कॅफे | | र.रु.३,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| १३ | शॉपिंग मॉल्स | | र.रु.२५,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| १४ | हॉस्पीटल (२० बेड्सवरील फक्त) - | | | | |
| अ | २० ते ५० बेड्स पर्यंत | | र.रु. १२,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| ब | ५१ ते १०० बेड्स पर्यंत | | र.रु.१५,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| क | १०१ बेड्स पेक्षा अधिक | | र.रु.२०/- प्रति बेड | | मुळ शुल्काचे ५० % |
| १५ | शाळा (खाजगी) (School Safety Certificate) | | र.रु.१५,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |
| | मनपा / शासकिय शाळा | | निरंक | | निरंक |
| १६ | व्यवसाय वाहनतळ इमारत | | र.रु.२०,०००/- | | मुळ शुल्काचे ५० % |

| २८ | अग्निशामक वर्दी पुर्तता प्रमाणपत्र - | | |
|---|---|---|---|
| अ | झोपडी (फोटो पास असल्यास मोफत) | र.रु ७००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| ब | निवासी | र.रु १,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| क | दुकाने | र.रु ३,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| ड | वर्कशॉप, लघुउद्योग, SSI,एन्टरप्राईज़्स, गॅरेज. | र.रु ५,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| इ | MAH. कंपनी, गोदामे, वाहन शो-रुम | र.रु ८,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| फ | प्रा.लि. मर्यादित कंपन्या | र.रु १०,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| ग | दुचाकी वाहन | र.रु २,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (i) | तीन चाकी वाहन | र.रु ३,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (ii) | चार चाकी वाहन ( हलके ) | र.रु ५,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (iii) | चार चाकी वाहन ( अवजड ) | र.रु ६,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| च | हॉटेलस् - | | |
| (i) | " सी " ग्रेड खालील | र.रु २,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (ii) | " सी " ग्रेड | र.रु ४,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (iii) | " बी " ग्रेड | र.रु ६,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (iv) | " ए " ग्रेड | र.रु ८,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |
| (v) | स्टार हॉटेल्स (सर्व प्रकारचे ) | र.रु १०,०००/- (प्रत्येकी) | लागू नाही. |

टिप :

१) ना हरकत दाखला मुदत संपल्याचे एका महिन्यानंतर, नुतनीकरण शुल्कावर विलंब आकार १०% प्रति महा.

२) मनपा हद्दीमधील पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण क्षेत्रातील उद्योगधंदा व्यवसाय यांनाही सदर ना हरकत दाखले घेणे आवश्यक आहे.

३) मनपा हद्दी बाहेरील अग्निशमन वर्दी पुर्तता प्रमाणपत्राकरीता दुप्पट शुल्क आकारणेत येईल.

४) सदर शुल्क मनपाच्या अग्निसुरक्षा निधी या स्वतंत्र लेखा शिर्षामध्ये जमा करण्यात येतील. (महाराष्ट्र आग व जीव सुरक्षा अधिनियम, २००६, चे कमल २५(१))

५) सदर शुल्क जमा रक्कम ही महाराष्ट्र आग व सुरक्षा अधिनियम २००६ चे कलम २५(३) नुसार फक्त मनपा अग्निशामक दलाचे केंद्र, वाहने, उपकरणे, साहित्य खरेदी करीता खर्च करण्यात येईल.

६) एकदा भरलेले शुल्क परत केले जाणार नाही. जादा शुल्क असल्यास फक्त परतावा अनुज्ञेय राहील. भरलेले शुल्क संबंधीत विकसक / बिल्डर यांची मनपा हद्दीमध्ये अन्य बांधकामाचे ठिकाणी अनुज्ञेय राहील.

७) मनपा हद्दीमधील एम.आय.डी.सी. क्षेत्राकरीता अग्निशामक ना हरकत दाखला लागू राहणार नाही.

८) जर एखाद्याने उक्त ना हरकत दाखला नियामाप्रमाणे घेणे आवश्यक असताना तसा सदरचा पुर्ण दाखला घेतला असेल. उदा. इमारत उंची प्रमाणे अनुज्ञेय ई. अशावेळेस तदनंतर नव्याने दुरूस्त दाखला देणेकामी संबंधीताकडुन दाखल्याची होणारी रक्कम दुप्पट दराने आकारणेत येईल.

९) उंची मधील " ० " चा अर्थ जमीनीपासुन (Ground Level & Avg Ground Level ) धरणेत येईल

१०) निवासी इमारती प्लॅन मंजूरी अग्निशामक ना हरकत दाखला, हा केवळ संपुर्ण निवासी वापराच्या ज्यांची जमिनीपासुन उंची (शेवटच्या स्लॅब पर्यंत) १५ मीटर व त्यापेक्षा अधिक आहे.

११) बिगर निवासी इमारती (क्र.३) मध्ये N.B.C. -२००५, पार्ट IV, Clause 3.1.1 प्रमाणे निवासी इमारती वगळता अन्य सर्व प्रकार (गट) इमारती यामध्ये समाविष्ट आहेत. (उदा. Hotel, Hospital, Mercantile, Industrial, Business, Storage, Educational, Assembly, Hazardous, Etc) सदर इमारतीची उंची १५ मीटर पेक्षा कमी किंवा अधिक परंतु बिगरनिवासी क्षेत्रफळ हे ५०० चौ. मीटर पेक्षा अधिक असणे आवश्यक

१२) इमारतींना अग्नि नाहरकत दाखल्याकरीता उक्त दर हे एकुण बांधकामाच्या Gross Built-up area वर लागू राहील.

१३) उंच, निवासी + बिगर निवासी (Mix Occupancy ) इमारतीमध्ये ५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त बिगर निवासी बांधकाम असल्यास सदर इमारत मिश्र इमारतीमध्ये धरणेत येईल.

१४) शुल्कांकरीता इमारतीची उंची जमीनी पासून (From Ground Level) शेवटच्या पॅरापेट वॉल (Terrace Parapet Wall) पर्यंत मोजली जाईल.

१५) मनपा/केंद्र/राज्य/शासकिय/प्राधिकरण मिळकती(इमारतीं) करीता अग्नि सेवा शुल्क लागू नाही. तथापी,BOT/PPP वा इतर कोणत्याही प्रकारच्या बांधकामांकरीता अग्नि सेवा शुल्क लागू राहील. (महाराष्ट्र फायर ऍक्ट कलम १५अन्वये)

१६) वार्षिक फि, एकुण शुल्काच्या १% जादा आकारणेत येईल. (महाराष्ट्र फायर ऍक्ट कलम १३(१)अन्वये)

१७) केंद्र शासन, राज्य शासन, अथवा महपालिकेने केलेले या संदर्भातील उपविधी, नियम, अधिनियम ई. वेळोवेळी लागू होतील.

१८) प्लॅन मंजूरी प्राथमिक ना हरकत दाखला (Provisional Fire NOC) घेतली असल्यास, सदर प्लॅनमध्ये वाढीव क्षेत्रफळ ५०० चौ.मी.पेक्षा जास्त बदल, इमारतीचे उंचीमध्ये ना हरकत दाखला शुल्क दराच्या स्लॅब बदलत असल्यास, वापर ( Occupancy) बदल असल्यास त्याकरीता सुधारीत ना हरकत दखला (Revised Fire NOC ) घेणे अनुज्ञेय राहील.

१९) एकदा अग्निशामक तात्पुरता ना हरकत दाखला घेतल्यानंतर ५०० चौ. मी. आतील वाढीव बांधकामाचे इमारतीकरीता पुनश्च सुधारीत अग्निशामक ना हकरत दाखला घेण्याची अवश्यकता नाही. अशा बांधकामांना अंतिम ना हरकत दाखला पुनश्च घ्यावयाचा असल्यास तो थेट अनुज्ञेय राहील.

३०/११/२४

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८